मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

नाटक ७२ स. १८८८

के. गो. ब. देवल

दुर्गा

( श्री प्रिंटर्स अ‍ॅण्ड स्टेशनर्स ठाणे )

नाटक

पुणें, "आर्यभूषण" प्रेस.

किंमत ६९, रु० हं० ६९.

# एकच दिवसाची चुकामूक.

अथवा

# दुर्गा नाटक.

एका इंग्रजी नाटकाच्या आधारानें

**गोविंद बल्लाळ देवल**

यांनीं रचिलें.

आवृत्ति दुसरी.

पुणें येथें "आर्यभूषण" छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केली.

[ या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क आर्यभूष
छापखान्याचे म्यानेजर यांनीं आपल्या
कडे राखिले आहेत. ]

१८८८.

नाटकाचे खरे मर्मज्ञ व सहृदय अशा लोकांस
हें लहानसें नाटक आंतील गुणाव-
गुणांसह कर्त्यानें अत्यादर-
पूर्वक समर्पण केलें
असे.

# दुर्गानाटकांतील पात्रें.

| | |
|---|---|
| जिवाजीराव कुंभे ... | ... एक सधन वृद्ध गृहस्थ. |
| चंद्रराव. ... ... | ... जिवाजीरावाचा वडील मुलगा. |
| तुळाजीराव... ... | ... " धाकटा " |
| आनंदराव.... ... | ... एक श्रीमान् तरुण गृहस्थ. |
| सोमाजीराव... ... | ... चंद्ररावाचा स्नेही. |
| काळ्या ... ... | ... गडी. |
| सटव्या ... ... | ... एक मारेकरी. |
| दुर्गा... ... ... | ... चंद्ररावाची बायको |
| बाळ्या ... ... | ... तिचा मुलगा. |
| कोंडाऊ. ... ... | ... दुर्गाची दासी. |

सरकारी शिपाई, मारेकरी वगैरे.

(हें नाटक राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपाल मे० क्यान्डी साहेब यांनीं पसंत केलें होतें; व याजबद्दल कर्त्यास ७५ रुपयांचें बक्षीस दिलें होतें.)

# या नाटकावर दिलेले कांहीं परीक्षकांचे अभिप्राय.

"This is a very creditable performance. It is a horrible tragedy of the type of some of the tragedies of Shakespeare......The story appears to be original. If it can be called an adaptation, it must be admitted to be a very successful adaptation......... In this novel attempt the author has attained considerable success. His language is chaste, natural, and occasionally humorous. The incidents are striking without being unnatural or absurd, and they keep up the interest of the reader till he goes to the end of the story.........The play would perhaps present many difficulties in acting, and possibly it may not be duly appreciated by an audience of ordinary tastes. But it is nevertheless an excellent reading."

| | |
|---|---|
| Kolhapur,<br>12th September 1885. | B. B. WAKHARKAR, B. A.<br>Vice-Principal, Rajaram<br>College, Kolhapur. |

---

"This is a good tragedy and I approve it. The dramatic effect is well sustained throughout

the play, and the development of the plot and characters is effected with considrable skill........The piece is rather difficult for acting. It will require actors of considerable skill to represent Durga and Tulàji."

10th September 1885. } N. G. Phatak, B. A., LL. B., District Magistrate, Kolhapur.

---

"Very effective and attractive; keeps one's mind always in excitement and curiosity......... It deserves a high place among the manuscripts that are sent for competition."

V. G. Apte, L. M. & S.

---

"नाटकाचें संविधानक बरेंच चांगलें आहे. शोकपर्यवसाय फारच मनाला लागणारा आहे. भाषा चांगली जशी असावी तशी आहे......आनंदराव हें पात्र जसें असावें तसें आहे. काळ्याचें पात्र फारच चांगलें आहे. त्यानें ह्मातान्या धन्याचें वर्णन दिलेलें फारच खुबीदार आहे. या पात्राची मदत नाटकाचें संविधानक स्पष्ट करण्यामध्यें होते. हें पात्र त्याच्या भाषेच्या योगानें पहिल्या नंबरचें शोभतें. कोंडाऊ हेंही पात्र उत्तमापैकींच आहे. चंद्ररावाचें पात्र चांगलें आहे व त्यास शोभा त्याच्या पत्नीच्या एकनिष्ठेमुळें होते. आतां मुख्य पात्र दुर्गा. हें तर सर्वोत्कृष्ट साधलें आहे. यांत कांहीं कमी दिसतच नाहीं ह्मटलें असतां चालेल, व ह्याविषयीं पाल्हाळ लावणें ह्मणजे उगीच चांगल्या गोष्टी सांगणें होईल......"

G. P. Gadre,
*Tutor to the Chief of Ichalkaranji.*

॥श्री दत्तात्रयमहाराज प्रसन्न॥

RAILWAY SELLAMU ... KALYAN ... CLASS

# एकचे दिवसाची चुकामूक !
अथवा
# दुर्गानाटक.

---

## अंक १ ला.

### प्रवेश पहिला.

### मुरलीधराच्या मंदिरा समोरील बाग.

तुळाजीराव–( हातांत पत्र घेऊन येतो ) कोणी कांहीं ह्मणोत; परंतु मला या जगांत पैशासारखें सुखाला दुसरें साधनच दिसत नाहीं, द्रव्याची आशा मोठी वाईट. तिच्यामुळें मनुष्याच्या हातून प्रसंगीं मोठमोठीं पापें होतात असें कोणी ह्मणतात, परंतु माझ्या मतानें तर या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, मनुष्याजवळ पैशाची ऊब आहे तोंपर्यंतच तो शहाणा, तोंपर्यंतच त्याला चारचौघांत मान, तोंपर्यंतच त्याला सौख्य, नाहीं तर त्याला विचारतो कोण ? त्यांतून स्वतःच्या अनुभवावरून मी तर सध्यां पैसा ह्मणजे परमेश्वर मानतों. कारण, आमचें घराणें पडलें लेंकवळ्याचें, द्रव्य आहे ह्मणून लोक विचारतात तरी! इतकें असून हे आमचे खुळे दादासाहिब आह्मांला पत्रें लिहितात कीं, "बाबासाहेबांचा आतां मजविषयीं ग्रह काय आहे ? त्यांचा राग कमी झाला कीं नाहीं ? मी बंदीखान्यांतून सुटून तिकडे आलों तर कसें होईल ? कुटुंबाकडील कांहींच हकीकत आपण लिहिली नाहीं ह्मणून फार काळजी लागली आहे, ती पत्रोत्तरीं दूर करावी." ( पत्र फाडीत फाडीत ) करतों बरें ! सर्व काळजी एकदम

दूर करतों. आतांशी तोच विचार रात्रंदिवस माझ्या डोक्यांत घोळत असतो. (पत्राचा चुरा दूर फेंकून देऊन)-ह्मणे मी तिकडे आलों तर कसें होईल ? फार खासें होईल ! आमच्या छातीवर सध्यां कोणी नाहीं, ते तुह्मी येऊन बसाल. अरे शहाण्या ! पूर्वी तूं इथें असतांना माझी स्थिति काय होती ती अजून मी विसरलों नाहीं. मेलेल्या भावाला जिवंत करून आपला हिस्सेदार करीन इतका मी दुधखुळा नव्हे बरें ! बाबांच्या समजुतीनें मेला आहेस तो तिकडेच मर. पैशापेक्षां मला कांहीं तूं जास्त नाहींस. यदा कदाचित् तिथून सुटून आलास तर तुझ्या दुधाच्या पेल्यांत विष कालवून ठेवावयाच्याच मसलतींत मी आहे. आनंदरावाच्या साहाय्यानें ती मी कशी तरी पार पाडणारच—अरे हा आनंदरावच आला वाटतें. स्वारी तिकडूनच आलीसें दिसतें. ( **आनंदराव** येतो. )

**तुळाजी**०—एकून तुह्मी खरे एकनिष्ठ भक्त यांत शंका नाहीं !

**आनंद**०—पण त्या निष्ठेची फलप्राप्ति इष्ट देवता प्रसन्न होईल तेव्हां !

**तुळाजी**०—अहो प्रसन्न ही झालीच पाहिजे. तिची पिच्छा मात्र सोडूं नका ह्मणजे झालें. तुम्हांला ठाऊक आहेच कीं, शिवाजीच्या हातीं सिंहगड कांहीं एका दिवसांत नाहीं आला.

**आनंद**०—तें खरें. पण आज सतत सात वर्षे मी तिच्या आराधनेंत हा देह झिजवीत आहें, तरी आशेवांचून मनाला दुसरा कांहीं आधार नाहीं !

**तुळाजी**०—मी ह्मणतों आशा तरी आहे ना ! मग आणखी काय पाहिजे ? आशा ह्मणजे कामी पुरुषांचें जीवन ! तेव्हां ती जर आहे तुह्मांला, तर ती मिळायचें कांहीं कठीण नाहीं.

**आनंद**०—परंतु ती तरी माझी मीच लावून घेतलेली ! मी आतांच सांगितलें ना कीं, माझ्या मनाला धीर येईल असें तिचें अद्यापि बिलकूल चिन्ह दिसत नाहीं. यावरून काय तें आणा ध्यानांत.

**तुळाजी॰**–नाहीं दिसलें त्याचें कारण मी सांगतों. अहो, ब्रह्मदेवानें स्त्री ही एक या जगांत अजब चीज पैदा केली आहे. क्षणांत हंसेल, क्षणांत रुसेल. क्षणांत मुरकेल, क्षणांत गुरकावील. एकदां हूं, एकदां अंहं, असे हां हां म्हणतां हजारों रंग दाखवील. मोठी मानी, मोठी संशयी, मोठी भित्री, मोठ्या कोवळ्या मनाची, अशी ही स्त्रीजात ! तेव्हां अमुकच एका मार्गानें वागलें ह्मणजे तिचें मन आपल्या स्वाधीन होईल असें कांहीं कुणाला सांगतां यायचें नाहीं. माझ्या मतानें तर त्याला एकच उपाय आहे. तो कोणता ह्मणाल तर वर्म पाहून घाव घालावा कीं, आलीच हातांत !

**आनंद॰**–ह्मणजे ?

**तुळाजी॰**–ह्मणजे एखाद्या अडचणीच्या प्रसंगांत गांठून लगट करावी कीं झालीच स्वाधीन म्हणून समजा. असें केल्यानें आपला कार्यभाग सहज साधून जातो. त्रास नको, आर्जव नको, कांहीं नको !

**आनंद॰**–ही तुमची युक्ति खरी आहे. पण यांत आपल्याकडे थोडा नामर्दपणा येतो. कारण, प्रसंगांत सांपडल्यावर पुरुषासारखा पुरुषसुद्धां पाहिजे त्याला हूं ह्मणेल, मग ही तर बायको ! ही कबूल होईल यांत विशेष काय ? मला खुषीचा सौदा करायचा. बरें आतां गप्पांत अर्थ नाहीं. तिची जाऊन गांठ घेतों.

**तुळाजी॰**–हं चला. पण माझी युक्ति तुह्मांला पसंत पडली नाहींसें दिसतें ? असो, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें कां होईना. कुणीकडून कार्यभाग झाल्याशीं कारण. इकडे पडलों तुमचा स्नेही, तिकडे पडलों तिचा दीर. दोघांकरितांही मला झटलेंच पाहिजे. ( इतक्यांत दुर्गा आपल्या वाड्याच्या खिडकींतून दिवस किती आला हें पहाण्याकरितां बाहेर पहाते. )

**तुळाजी॰**–अहो, ती पहा वयनी खिडकींत उभी आहे. आमचे बंधु वारून आज सात वर्षे झालीं, पण बिचारीची ती दुःखित मुद्रा पाहून नुक्के काल वारले कीं काय असें वाटतें !

**आनंद॰**–प्रीति ह्मणजे अशीच असली पाहिजे. बरें जातों तर. ( असें ह्मणून दुर्गीच्या वाड्याकडे निघून जातो. )

**तुळाजी॰**–( आपल्याशीं ) बाबा ह्मणतात त्याप्रमाणें ही माझी पांढऱ्या पायांची भावजय खरोखरीच मूर्तिमंत साडेसाती आहे! कांहीं तरी कुभांड रचून मीं हिला आमचा वाडा तर बंद केलाच. आतां माझें पुढचें काम ह्मणजे इतकेंच कीं, ही घोरपड आनंदरावाच्या गळ्यांत घालावयाची! ह्मणजे थोडक्याच दिवसांत स्वारीचें वाटोळें झालें ह्मणून समजावें, आणखी त्याच्याच गळ्यांत घातली पाहिजे. कारण, त्याच्या सर्व घरच्या माणसांना श्रीमंतीची मोठी घमेंडी चढली आहे. वास्तविक पहातां कालभीक मागत फिरत होते; पण कुठें रेषा उपटली म्हणून या भाग्याला चढले. तेव्हां थोरपणाचा इतका गर्व येणें, व आम्हीं ह्मणजे अगदीं यःकश्चित् नादान मनुष्य आहोंत असें त्यांनीं मानणें हें कांहीं आपल्याला पसंत नाहीं. आतां आनंदरावाशीं जरी मी वरवर स्नेहभावानें वागतों, तरी त्याच्या घरच्या माणसांची रिकामी ऐट मला सहन होत नाहीं. या आनंदरावाच्या बहिणीनें आपल्या स्वरूपाच्या व थोरपणाच्या तोऱ्यांत माझा अव्हेर केला हीही गोष्ट माझ्या मनांत जळत आहे.त्या अपमानाचें स्मरण झालें ह्मणजे सर्वांगाचा भडका होऊन जातो. माझ्यांत तिनें असें कोणतें व्यंग पाहिलें होतें? माझें घराणें अगदीं हलकट असें तिला वाटलें काय! आणि त्या पोरीच्या बोलण्याला या आनंदरावाच्या थेरड्यानें आणि थेरडीनें रुकार दिला काय? बरें आहे ह्मणावें! याचा वचपा काढीन तेव्हां सोडीन! वयनीच्या पायगुणानेंच कां होईना, पण त्याच्या घरादाराची धूळधाण करवीन तरच नांवाचा तुळाजीराव! आणखी मी ह्मणतों त्याप्रमाणें होणार; कारण वयनीविषयीं आनंदरावाच्या मनांत आज सात वर्षें खिळून राहिलेली आशा त्याच्या देवाच्यानें सोडवत नाहीं. तो तिच्या पायां पडेल, तिचीं आर्जवें करील, काय पाहिजे तें करील, पण तिच्याशीं पाट लावील. तिलाही सध्यां कोणाचा आधार नाहीं

तेव्हां अन्नान्न दशा झाली ह्मणजे तीसुद्धां नाहीं ह्मणायची नाहीं. ( किंचित् विचार करून व इकडे तिकडे फिरून ) तें एक तिचें कारटें ! सापाच्या पोराप्रमाणें माझ्या मार्गांत विघ्न करणारें आहे! तिला बाहेर घालविल्यामुळें त्याची कांहीं फारशी भीति नाहीं ह्मणा. परंतु न जाणों. बाबांची लहर आहे ती ! त्या कारट्याची मला लवकरच कांहीं तरी व्यवस्था लावली पाहिजे. चला आतां. कुठें तरी फिरकी मारून परत जातांना वयनीच्या बिऱ्हाडावरूनच घरीं जाऊं ह्मणजे झालें. ( असें म्हणून निघून जातो. )

## प्रवेश २.

### दुर्गाचें घर.

[ मुलगा मांडीवर घेतलेली **दुर्गा व आनंदराव** बोलत असतांना पडदा उघडतो. ]

**दुर्गा**–आनंदराव, तुह्मीं कां बरें उगीच माझी पाठ पुरवितां ? मी कीं नाहीं चहूंकडून अगदीं नाडून गेलें आहें. माझ्या जिवाची खरोखरच ओढाताण झाली आहे. तेव्हां तुम्हांला मी आतां काय देऊं ? काय उरलें आहे माझ्यापाशीं ? तुमचे माझ्यावर खंडो-गणती उपकार झाले आहेत. एखादा भाऊ देखील आपल्या बहिणीचा अशा विपत्तींत इतका समाचार घ्यायचा नाहीं! मित्रांनीं सोडलें, मैत्रिणींनीं टाकलें, नातेवाइकांनीं दूर केली ! अशा प्रसंगीं तुह्मीं या अनाथ लेकराच्या आईचा इतका समाचार घेतां हें कां थोडें झालें ? ( डोळ्यांतून पाणी काढते. )

**मुलगा**–आई, ललतीस ग कां ?

**दुर्गा**–माझें नशीच खोटें ह्मणून रडतें बाळा !

**आनंद०**–पण यांत मी विशेष तें काय करतों ? कोणालाही स्नेहधर्म पाळलाच पाहिजे.

**दुर्गा**–होय. ह्मणूनच मेलें मला वाटतें कीं स्नेहभावानेंच स्ने-

द्दभावाची फेड करावी. पण काय करूं? भिकारीण पडलें ना! यासाठीं सांगतें माझा लोभ सोडून देऊन सुखांत नांदा.

**आनंद**०–सुख! तुमच्यावांचून मला सुख कसें होणार बरें? मी जो द्रव्यसंचयाचा एवढा खटाटोप चालविला आहे, तो तरी या आशेवर कीं तुह्मीं आम्हीं मिळून कधीं तरी त्याचा उपभोग घेऊं.

**दुर्गा**–तुमचें बोलणेंच आतां मला ऐकून उपयोग नाहीं. (तोंड फिरविते.)

**आनंद**०–अस्सा अस्सा आज सात वर्षे अस्सा मी तुमच्या नादांत गुंतलों आहें, व माझ्या कमनशीबानें माझी इच्छा जरी पूर्ण झाली नाहीं, तरी तुमच्या नादांतच मरेपर्यंत दिवस काढीन. असेंच समजा कीं माझा तुह्मी अंगीकार करीपर्यंत मी जीवंत काय आणि मेलों काय एकच.

**दुर्गा**–हीं भाषणें मला आतां अगदीं विषासारखीं कडू लागतात. नको. नको! बाळ्याच्या तोंडाकडे पाहिलें ह्मणजें पूर्वीचें सगळें डोळ्यापुढें उभें रहातें; आणि 'माझ्या मागें तूं या जगांत इतके दिवस राहिलीस कशी?' असें ह्मणून मला ते रागेंच भरतात कीं काय असें वाटतें. (मुलाचें चुंबन घेते.) बाळ्या! मी तरी काय करूं बरें! मला सुख कां वाटतें यांत?

**आनंद**०––झालें! इथें बोलणेंच खुंटलें! असें कांहीं तरी तुमचें दुःखाचें बोलणें ऐकलें ह्मणजे आशेची चटकन् निराशा होते; पण चमत्कार हा कीं, माझें मन अधिकाधिक वेधून जातें. तुमच्या लग्नापूर्वी मी तुह्मांला नुसत्या या दृष्टीनें पहात होतों, व तेवढ्यावरूनच त्या वेळीं माझ्या मनांत तुमच्याविषयीं लोभ उत्पन्न झाला होता. पण तेव्हांपासून तुमच्याच चिंतनामुळें, व नित्य सहवासाच्या योगानें तुमच्या सद्गुणांचा अनुभव येत गेल्यामुळें, मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं, त्या वेळची ती केवळ कामवासनाच होती. परंतु आतां तिला प्रेमाची व विचाराची भर पडली आहे. सध्यां तुमच्यावर आकाशच कोसळल्या-

सारखें झालें आहे. तथापि माझें तुमच्या वरचें प्रेम चंद्रकलेप्रमाणें नेहमीं वाढतेंच आहे.

**दुर्गा**--तुह्मीं नाहींना ऐकत ? हें पंहा माझ्यासाठीं जर तुमच्या मनांत कांहीं थोडी कळकळ असेल, तर कृपा करून हें असलें भाषण एकदम बंद करा कसें ! माझ्या मनांतून सासऱ्याला भेटायला जायचें आहे, पहातें एकदां नशीबाची परीक्षा करून. ह्मणून ह्मणतें तुह्मी चला आतां.

**आनंद०**--मी कांहीं नको ह्मणून आग्रह करीत नाहीं; पण सासऱ्याला भेटून कांहीं फायदा होईल असें मला तर दिसत नाहीं. खर्चाला पाहिजे असेल तर माझ्यापाशीं कां नाहीं मागत बरें ? खरेंच ह्मणतों, अडचण आहे कीं काय ?

**दुर्गा**--मी सांगितलें ना एकदां कीं मनाचा संशय एकदां मी फेडून घेणार. होय नाहीं तर नाहीं. पण मेली रुखरुख नको मागून.

**आनंद०**--बरें तर, येतों मी. ( असें ह्मणून निघूनजातो. )

---

## प्रवेश ३.

### ( दुर्गा सासऱ्याच्या वाड्याकडे चालली असतां मागून तुळाजी येतो )

**तुळाजी**--अरे ही आमची भावजय ! पोराला कडेवर घेऊन कुणीकडे निघाली बरें ? ( जरासा पुढें जाऊन ) अरे, ही आमच्याच वाडयाकडे वळली. हं! समजलों. ही बाबासाहेबांकडे तोंड पसरायला जात असेल. ठीकच आहे! पोटांत आग पेटली म्हणजे कुरा कसा राहणार! बरें आहे. जा म्हणावें ! तोही म्हातारा पक्का खप्पी आहे ! तो हिला आणि हिच्या कारट्याला एक क्षणभर देखील दारापाशीं उभें राहूं द्यायचा नाहीं. मीही पण मागच्या दरवाज्यानें आंत जाऊन बसतों. म्हणजे काय काय

मजा उडेल ती ऐकायला सांपडेल. (असें ह्मणून झटकर जातो. दुर्गा पुढल्या दरवाज्यापाशीं जाऊन पोंचते )

**दुर्गा**--अग बाई ! हा तर बंद केला आहे! देवा! आमच्या आजापणजांच्या वेळीं श्रीमंतांच्या घरीं अंधळ्या पांगळ्यांना, दीन अनाथ माणसांना सदां मुक्तद्वार असे ह्मणून सांगतात तें-काय तर मग ? ती धर्मबुद्धि आतां कुणीकडे गेली ? धर्मात्मा कुणी राहिलाच नाहीं कां ? नाहीं तर मेला माझ्याच फुटक्या नशीबाचा हा खेळ म्हणावा झालें ! (दारावर हळूच धक्का मारते.) कुणी आहे का? दार उघडा.

**मुलगा**-( कडेवरूनच दरवाज्यावर भराभर हात आपटीत ) अले दाल उघल किले.

( **काळ्या** गडी दिंडी उघडून बाहेर येतो. )

**काळ्या**-काय कार है इचिभन ! उगिच का लावलिया पिर-पिर आं ? जनुका कुनी अवतनुच धाडल व्हत ! आमच धनी कस हैती तुला दकल न्है व्हय ? हत कोन तुला येची ह्मन्नार न्है न् कायबी न्है. का आल का ध्येनांत ?

**दुर्गा**-कां बाबा ! पण तुझे धनी घरांत आहेत का ?

**काळ्या**-माज धनी घरांत हैति का ?

**दुर्गा**-जिवाजीराव कुंभे इथेच राहतातना ?

**काळ्या**-व्हय व्हय. हतच ऱ्हात्यात. त्ये माज धनी न् मी त्येंचा चाकर. पन् बाई त्येची चवकशी तुला कशापायी ?

**दुर्गा**-कशापायीं ह्मणजे? तुला नाहीं का ठाऊक मी कोण ती?

**काळ्या**-मला न्है बा ठाव. तुला कंधीं बगितल्यावानी वाटत-या. पन आमी पडलो चाकरमानस. तवा आमास्नी कुनाची वळक असली तरी बी न्है ह्मन्न भाग पडतया. का म्हुन् न्है इचारलस ?

**दुर्गा**-कां बरें ?

**काळ्या**-का बर ह्मंजी ? आह्मास्नी धन्याची सेटर बसत्यात

म्हुन. ( असें ह्मणून दिंडी ढकलूं लागतो. इतक्यांत बाहेरून कोंडाऊ या नांवाची दुर्गाची कुळंबीण येते. )

**कोंडाऊ**–हं दिंडी लावूं नकोस रे. मेल्या देवानें तुला सोन्या-सारखें तोंड दिलें आहे, नि असें घाणेरडें काय बोलतोस तें? मी आपली इथें बाजूला उभी राहून ऐकत होतें. म्हटलें काय काय बोलतो तें तरी पाहूं. चांगलें सुधें बोललास तर नांवाला डाग लागेल वाटतें? ही बाई कोण ह्मणून समजलास तूं? ( काळ्या तिच्याकडे रागानें बघतो. )

**दुर्गा**–तूं आलीस ह्मणून बरें झालें. नाहीं तर यानें कांहीं माझी दाद लागूं दिली नसती. दिवस फिरले ह्मणजे चाकर-माणसें सुद्धां फिरतात बरें!

**कोंडाऊ**–या माझ्या सोन्याच्या तुकड्याला आंत जायला अटकाव ह्मणजे काय! ( मुलाचा मुका घेते. ) बाईसाहेब, तुह्मीं चला आंत ( दुर्गा आंत जाते. ) काळ्या, तुला किनई अगदीं कळत नाहीं. अडदांड कुठला! कुणाला काय बोलावें नू कुणाशीं कसें वागावें हें आतां तरी नीट ध्यानांत ठेव.

**काळ्या**–अग उग बस! तुला मी मागपुन् वळकुन् हे. तुला अदुगर कोनीं हटिकल व्हत? गुमान आल्या वाटन जाव, त्ये दुसऱ्याच कोरड्यास ढवळायची तुला का जरूर! तूं ह्मन आंत जा! बाबा साइबाची खेटर बसत्याल मला. तिला भाइर काड-तास का मी धरूं रट्याला?

**कोंडाऊ**–असेंबोलूं नये काळ्या. प्रत्यक्ष बाबासाहेबांच्या वडील सुनेला, नि तिच्या मुलाला आंत जाऊं दिलें नाहींस, तर लोक शेण घालतील कीं तुझ्या तोंडांत! घरच्या माणसांना कारे कोण आडवितें?

**काळ्या**–मग कस कर ह्मनूतीस? आमी पडलो हुकमाची मानूस. तवा हुकूमापरमानू वागाय व्होव. बर पनू ही बाई कशा-पायीं आलिया हत? कंच काम हे? माज्या अदुगर तूं या वा-ड्यांत व्हाइली व्हतीस म्हुनू इचारतो. ही बाई चांगली, अस सार

जन ह्मनूत्यात इकूत असुनशेनी ह्रिच्या सासऱ्यान–मंजी आमच्या बाबासाइबांनीं हिच अस. का हाल मांडल्याती ?

**कोंडाऊ**–हं तें मी सांगतें. तुला ठाउकच आहे कीं मी कांहीं तिखट मीठ लावून सांगणारी बायको नव्हे. जें आहे तें थोडक्यांत, पण खरें खरें तेवढं सांगतें.

**काळया**–हुं सांग तर. तंबी लइ गमती ह्मतारी हैस !

**कोंडाऊ**–मेल्या अजून चाळिशी सुद्धां उलटली नाहीं, नि इतक्यांत मी म्हातारी झालें कारे ?

**काळया**–बर ऱ्हायल ! तरनी जानू फटाकडीवानी हैस झाल ? पन म्होर सांग.

**कोंडाऊ**–बरें तर ऐक. तुझ्या बाबासाहेबांचा थोरला मुलगा चंद्राजीराव ह्मणून होता. त्याच्यावर बाबासाहेब अगदीं जीव कीं प्राण करीत असत. तोही पण रूपानें काय, गुणांनीं काय, खरोखर वाखाणणी करण्यासारखा होता. एखाद्या राजाच्याच पोटीं यायचा पण नशीब खोटें ह्मणून यांच्या पोटीं आला होता इतकेंच. तेव्हां काय झालें–हो–किती झालें तरी मेली पोरबुद्धि कीं नाहीं ! त्या चंद्ररावानें आपल्या इष्ट मित्रांना न विचारतां, बाबासाहेबांचेंही भय न बाळगतां, या दुर्गांबरोबर आपल्याच हट्टानें खेड्यांत जाऊन लगीन केलें.

**काळया**–कस म्हंतूलस, हट्टान ? छे ! ह्ये तर त्येनी लइ वंगाळ काम क्येल. मीं म्हनूतो तिची तरी कबुली घ्येवी की न्हे ?

**कोंडाऊ**–तसें नव्हेरे. तिची कबुली होती. पण तिला आई नाहीं, बाप नाहीं. तेव्हां तिच्याकडून हुंडापांडा काय मिळणार ? म्हणून बाबासाहेबांच्या मनांतून तिला आपली सून करून घ्यायचें नव्हतें. समजलास ?

**काळया**–हां ! आल ध्येनांत. इचिभन समदीं भाण्डूण पैशापायीं ! ह्योच हंडाभर हुंडा घावला असतां, मंजी बाबासाच खुस झाल असत. कैकाइनीवानी असती तरी बी तिला त्यानी आपली सून करूनशेनी घेतली असती ! बर ह्मोर ?

**कोंडाऊ**—ह्मोर काय कुपाळ! आपल्या मुलानें आपल्यास विचारलें देखील नाहीं म्हणून बाबासाहेबांची त्याच्यावर खप्पा मर्जी झाली. पुनः तोंड दिखील पांहायचा नाहीं म्हणून त्यांनीं खंडोबापुढें शपथ वाहिली. जिनगीदौलतीचा मालक तुळाजी-रावाला करून त्याला मर्जीत घेतला. पूर्वीं नाहीं तर त्याच तुळाजीरावाला पाहून बाबासाहेबांच्या तळपायाची तिडीक मस्तकाला जात असे. बरें! पण मेलें कायसें ह्मणतात कि नई त्यांतली गत. मी ह्मणतें इतकें करून तरी त्यांचा राग जावा कीं नाहीं. पण म्हातारपणचा राग तो! सरकारचे कान फुंकून शेवटीं चंद्ररावाला जबरदस्तीनें लढाईवर धाडला, तो बिचारा तिथेंच आटपला! झालें आटपलें रामायण न् काय?

**काळया**—अरेरे! गरीब परानी! बर ह्मोर?

**कोंडाऊ**—पुढें इच्याच पायगुणानें तो मेला असें ह्मणून तिला वाडा बंद केला.

**काळया**—बग इचिभन कसा वाकडा इनसाब ह्यो? नवऱ्या-पायीं त्येच्या बायकुच हाल. लई दिस मी हिला अशीच बगतुया.

**कोंडाऊ**—त्यांतून तरण्या ताठ्या बायकांनीं नवऱ्याशिवाय दिवस काढायचे ह्मणजे फार कठीण आहे बाबा. कुणावर असा प्रसंग येऊं नये एवढंच खरें.

**काळया**—अग त्ये बग, बाबासाब आन् ती तुह्मी बाई बो-लत्याती. जा वाड्स बाजूला उबी ऱ्हा जा. मी बी सद्रवर बसतों. (असें म्हणून दोघेंही जातात.)

---

## प्रवेश ४.

### (जिवाजीराव व मुलगा घेतलेली दुर्गा.)

**जिवाजी**—ज्यांनीं तुला माझ्याकडे यायची मसलत सांगि-तली त्यांनीं तुला खरोखर फसविलें. हा नव्हे तुझा रस्ता; जा,

निघ. आलीस तशी चालती हो. डोळ्यापुढें उभी राहूं नकोस माझ्या. माझ्यापासून तुला कांहीं मिळायचें नाहीं. चल, निघ !

**दुर्गा**–मला देखील तुमच्यापासून कांहीं नको. पण मेलें मनुष्य विपत्तींत पडलें ह्मणजे त्याला दुसऱ्यापाशीं तोंड वेंगाडणें भाग पडतें. तुह्मी माझें बोलणें शांतपणानें ऐकून घ्याल असें मला वाटलें होतें, पण—

**जिवाजी०**–पण काय ? काय बोलशील तूं! किती बोलशील? तुझ्या–अवदसेच्या–पायगुणानें माझ्यावर अनर्थ कोसळला, माझ्या वृद्धापकाळचा सर्व आधार तुटला; माझ्या सुखाचें तूं मूळच खणून काढलेंस; या गोष्टी तूं कितीही बडबडलीस, आणि कितीही रडलीस तरी भरून येतील का ?

**दुर्गा**–तुमची एकट्याचीच का अशी अवस्था झाली ? माझ्या नाहीं का जन्माचें मातेरें झालें ? ( दुःख दाबून डोळे पुसते. )

**जिवाजी०**–हां, ह्मण असें. असें बोललीस तर मोठ्या आनंदानें मी तुझें रडगाणें ऐकून घेईन.

**दुर्गा**–एकूण माझी हालअपेष्टा झाली ह्मणजे त्यांत तुह्मांला आनंद आहे म्हणायचा ?

**जिवाजी०**–आहे म्हणजे ? दुसरी या जगांत मला आनंदाची गोष्टच उरली नाहीं.

**दुर्गा**–तर मग घ्या आनंद करून ! माझा सर्वस्वी नाश झाला आहे खरा.

**जिवाजी०**–बस्स, बस्स ! तुझी दुर्दशा व्हावी हेंच माझें देवापाशीं गाऱ्हाणें होतें. तें त्यानें ऐकलें. आतां माझा आत्मा थंड झाला; नाहीं तर मेल्यावर समंध होऊन तुला छळलें असतें. समजलीस ?

**दुर्गा**–देवा ! हाच कारे वडिलांचा अशिर्वाद ! जन्माचें सुख तर त्यांच्याबरोबर नाहींसें झालें होतें, पण तसाच कांहीं दिवस जीव वांचविला. आतां मेली तीही आशा उरली नाहीं. कांहीं जवळ होतें नव्हतें तें सगळें या पोटाच्या भरीला घातलें. शेवटीं

अगदीं निरुपाय होऊन तुम्हीं सख्खे सासरे म्हणून तुमच्या दाराशीं आलें. तुह्मांला जर कांहीं या अनाथ लेंकराची दया आली तर पहा, नाहीं तर–( रडूं लागते ). बाळ्या, पड बाबा, आजोबांच्या पायां पड. तुझ्याकडे बघून तरी त्यांना आपल्या मुलाचें स्मरण होऊंदे. ( मुलगा पायां पडावयास जातो. जिवाजीराव रागावून मागें सरतो. मुलगा भिऊन रडूं लागतो. ) मामंजी, मी तुमच्या-पुढें पदर पसरतें, या लेंकराकडे पहा. मी नाहीं इतकी माझ्या जिवाची पर्वा करीत, पण हा पोटचा गोळा म्हणून जीव तडफडतो हो, काय करूं!

**जिवाजी**०–या मुलाबद्दल मलासुद्धां वाईट वाटतें, पण तुझ्या पोटचाना तो?

**दुर्गा**–अरे कपाळा! असा दावा उगविणें आपल्या सारख्यांना शोभत नाहीं बरें. आपलें नातवंड म्हणून तरी त्याचा सांभाळ करा.

**जिवाजी**०–करीन पण तूं आहेस साडेसाती. तुझें मग त्याला वारेंसुद्धां लागून उपयोगाचें नाहीं. कबूल आहे तुला हें?

**दुर्गा**–काय कबूल आहे का म्हणता? त्याचें मला तोंड दि-सावयाचें नाहीं हें? नकोग बाई तें! माझ्या सोन्याकडे पाहून मी इतके दिवस जिवंत राहिलें, आणि आतां जर तुम्हीं त्याला दूर केलात तर माझी काय वाट? मामंजी! इतके कसे हो तुम्हीं निष्ठुर झालां? असें असेल तर मी आपली त्याला घेऊन जातें कशी. कुठेही चार घरें मागून त्याच्या पोटाला घालीन. माझा जीव मला जड झाला आहे, पण माझें लेंकरूं नाहीं मला जड झालें, समजलांत? ( मुलास पोटाशीं धरते )

**जिवाजी**०–तर हो चालती आपल्या कारट्याला घेऊन; भीक मागून पोटाला घाल कीं कसेंही घाल. चल निघ.

**दुर्गा**–जातें बरें! चल बाबा ( मुलग्यास घेऊन ). कांहीं केलें ह्मणून दगडाला का पाझर फुटेल!

**मुलगा**–आई, मला भूक लागली, जेवायला केव्हां घालनालग.

**दुर्गा**–चल घरीं घालतें हं. ( असें ह्मणून डोकें पुसीत मुलाला घेऊन निघून जाते. )

**जिवाजी**०–काळ्या ! ए काळ्या ! ( काळ्या येतो ) कायरे ए गध्या, तुला इथें गाढवें राखायला ठेवला होता कारे ?

**काळ्या**–गाढव कशापायी बाबासाब ! दरवाजा राकांत बसलुया नव्ह का ?

**जिवाजी**०–मग ही तुझी काकी कशी आली होती तर आंत?

**काळ्या**–माझी काकी कशाला येतीया हत. त्याच बाईन वरडून वरडून डोक्स उटिवूल म्हून दिंडी उगडून्शेनी भाइर ग्येलों. आन् मी नग नग ह्मनतोया तरीबी बेगुमान आंत घुसली. धादा सांगितल बगा बाबासाब ! तवा ह्यांत माजा कंचा अन्याव वर ?

**जिवाजी**०–तिला आंत येऊं नकोस म्हणून तूं दहादां सांगितलेंसना ? ठीक केलेंस ! असा असावा हुषार चाकर ! बरें आतां तिच्या घराकडे जा, आणि सांग कीं मी त्यांच्याकडून आलों आहें. चार घरें जास्त मागून माझ्याही पोटाची तजवीज कर ह्मणावें. जा, मला तुझ्यासारख्या मगरूर चाकराची जरूर नाहीं. पुनः हा उंबरा चढलास तर पाय मोडीन. सांगून ठेवतों. ( काळ्या 'का बाबासाब' करीत असतां जिवाजीराव त्याचें बोचकें व कांबळें त्याच्या अंगावर फेंकून देतो, व आपोआप जात नाहीं, असें पाहून त्याच्या रख्याला धरून त्यास बाहेर घालवितो. तो गेल्यावर पुटपुटत दरवाजा लावून घेतो. )

( अंक पहिला समाप्त. )

# अंक २ रा.

## प्रवेश १.

### रस्ता.

( आनंदराव व तुळाजीराव येतात. )

**आनंद०**–दुर्गाचें व तुमच्या वडिलांचें बोलणें झालें तें तुह्मीं सर्व ऐकलें ह्मटलेंत, म्हणून विचारतों. त्या बिचारीची दुर्दशा पाहून, किंवा त्या पोरक्या लेंकराकडे पाहून तुमच्या बाबासाहेबांच्या मनाला कांहीं द्रव आला का ? ( तुळाजीराव वाईट तोंड करून नकार दर्शवितो. ) नाहीं ! तुमच्या मुद्रेवरून कांहीं सुचिन्ह दिसत नाहीं, तुम्हाला तर त्या दोघांबद्दल वाईट वाटतच असेल म्हणा, परंतु तुमचे वडील–जाऊंद्या तुमच्याकडे बघून मी गप्प बसतों. खरोखर तुम्हीं त्यांचे चिरंजीव शोभत नाहीं ! तोंडावर तारीफ करावी असें नाहीं, पण तुमच्यासारखा जिवास जीव देणारा मित्र दुसरा मिळणें कठीण.

**तुळाजी०**–हें काय परस्पर आहे. मला तरी तुमच्या सारखा मिळेल का ? नाहीं ! आतां आमच्या बाबांच्या संबंधानें गोष्ट काढलीत म्हणून सांगतों. आमच्या वाड्यांत पोरकें पोर अथवा अनाथ बायको या शब्दांचा अर्थच ठाऊक नाहीं ! मग तसें जर कुणीं आलें तर द्रव कुणाला येणार ? पण त्याबद्दल तुह्मीं बाबांना दोष लावूं नका. कारण, त्यांचा असा ग्रह झाला आहे कीं, त्या साडेसाती बरोबर लग्न केलें ह्मणून चंद्रराव लढाईंत पडले. पण जाऊंद्या ही वाटाघाट मला कशाला पाहिजे ? उगीच स्नेहांत मात्र व्यत्यय यायचा. तुह्मी माझे जिव्हाळ्याचे मित्र, आणि ती माझी सख्खी भावजय ! तेव्हां उभयतांचेंही हित व्हावें म्हणून मी या कृत्यांत इतकें मन घातलें आहे. दुसरें कांहीं कारण नाहीं.

आनंद०—हित व्हावें! आणि तें उभयतांचेंही! छे छे छे छे!! तिला तुह्मी म्हणतां त्याप्रमाणें बिकट प्रसंगांत गांठून आपलें हित साधून घ्यावें असा माझा बिलकुल उद्देश नाहीं बरें! तिची दुर्दशा करण्यांत तुमच्या बाबांचा कांहीं तरी मतलब असेल. पण माझें तर उलटें असें आहे कीं, तिचें सुख तें माझें सुख. म्हणून ज्या योगानें तिला सुख होईल तें मला कर्तव्य. समजलांत?

तुळाजी०—मग मी तरी तेंच म्हणतों. बाबांनीं तिचे हाल चालविले आहेत हें पाहून देवाशपथ मला फार वाईट वाटतें. पण करूं काय? माझा कांहीं इलाज चालत नाहीं. त्यांना तर मी अक्कल शिकवायला जायचें नाहीं! तरी सहज बोलतां बोलतां दोन तीनदां निरनिराळ्या तऱ्हेनें गोष्ट काढली होती कीं, हें करणें लौकिकांत बरें दिसत नाहीं, नांवाला बट्टा, शिवाय अमक्या अमक्याच्या सुनेची अशी स्थिति झाली, अशी चोहोंकडे कुजबुज होऊं लागलेली माझ्या कानावर आली. असें, आनंदराव, पुष्कळ सांगून पाहिलें. पण आमचे बाबा काय विचारतां! जें एकदां डोक्यांत शिरलें तें शिरलें. मग तें ब्रह्मदेवाच्या बापाला सुद्धां निघायचें नाहीं! तरी मी म्हणतों कीं, जें झालें ते एका अर्थानें बरेंच झालें. कसें? तर या स्थितींत ती आहे तोंपर्यंतच तुमचें काम साधायचें असलें तर साधेल.

आनंद०—पुनः आपलें तेंच! मी तुम्हाला सांगितलेंना कीं, मी असा नामर्दपणा पत्करायचा नाहीं. त्यांतून ती आहे खंबीर मनाची बायको! ती या हालाला मुळींच जुमानीत नाहीं!

तुळाजी०—हेंच तें! आनंदराव! अशा नाजूक कामाला इतका धार्मिकपणा काय उपयोग बरें! अहो, 'येन केन प्रकारेण' आपलें काम साधून घ्यावें, आणि मग पाहिजे तितका धार्मिकपणा दासवीत बसावें. हें पहा, असा एक साधारण नियम आहे कीं, भिडस्त, अब्रूला भिणाऱ्या अशा बायका, प्रसंगांत सांपडल्या असल्या म्हणजे बहुतकरून तेव्हांच वश होतात.

आनंद०—(आवेशानें) होत असतील, पण त्याचें मला काय?

अशा रीतीनें तिला वश करून घ्यायचें हें काम माझ्या हातून प्राण गेला तरी व्हायचें नाहीं. माझी इच्छा पूर्ण झाली नाहीं तरी बेहेत्तर आहे. मरेपर्यंत नुसत्या आशेवरच दिवस काढीन. स्वसंतोषानें तिनें आपला देह मला अर्पण केला तरच मी त्याचा स्वीकार करीन, व त्यांतच मला भूषण आहे. नाहीं तर प्रसंगांत गांठून, फसवून– नको नको नको! मला तें कर्तव्यच नाहीं.

**तुळाजी**०–या सोडून! तुह्मांला बरें वाटेल तसें तुम्हीं करा. पण मी जें सुचविलें तें केवळ स्नेहभावानें सुचविलें एवडें ध्यानांत ठेवा म्हणजे झालें.

**आनंद**०–तें झालें. त्याविषयीं मला शंकाच नाहीं. बरें, जातों आतां उशीर झाला.

**तुळाजी**०–पुढें भेट?

**आनंद**०–अहो, भेट नेहेमीचीच आहे. (जातो.)

**तुळाजी**०–( तो गेला असें पाहून आपल्याशीं ) शेंपूट आणि शिंगें नाहींत! बाकी खरा बैलोबा! आह्मांला झालें तरी असलींच देवमाणसें उपयोगीं पडतात! तूं पाहिजे त्या मार्गानें तिला वश करून घे, माझा कार्यभाग साधला ह्मणजे झालें. तुझा स्वभाव मी पक्का ओळखून आहें. तूं जसजसा आपल्या मनाचा थोरपणा दाखवीत जाशील तसतसा माझ्या मसलतीला जोरच येणार! बरें, आतां अगोदर आमच्या भावजयीकडे जाऊं; कारण, पदरांत माप पडेपर्यंत तिच्याही तोंडावर मला वरचेवर साखर पेरली पाहिजे! करता काय? (जातो.)

---

## प्रवेश २.

### दुर्गाबाईचा वाडा.

**(दुर्गा व कोंडाऊ, मुलगा** खेळांत गुंतला आहे.)

**दुर्गा**—कधीं नाहीं कधीं सर्वांचा शेवट हा व्हायचाच. आतां दिसतें तें ह्मणजे घटकेनें दिसेल असा कांहीं नेम नाहीं. जें

एकदां गेलें तें गेलें. म्हणून म्हणतें, कीं, राजा काय नि रंक काय! सर्वांची एकच वाट शेवटीं. यमाच्या दरबारांत लहान, थोर, सगळे सारखेच. सगळ्यांना एकाच तराजूनें जोखायचें. श्रीमंती न् गरीबी या जगापुरतीच मेली. देवा! या पापिणीचे डोळे कधीरे मिटतील? या जाचांतून मी एकदां कधीरे सुटेन? तुला कां या हतभागिणीची कींव येत नाहीं? एकदां आपल्याजवळ घेऊन जा म्हणजे सुटलें बाबा! ( रडूं लागते. ) पण तिथे जर का माझ्या सासऱ्यासारखाच कुणी निर्दय कारभारी असला तर मग आटपलेंच! पण देवाच्या घरीं तसें नाहीं व्हायचें. त्याला मी न् माझा सासरा दोघेही सारखींच.

**कोंडाऊ**–बाईसाहेब,असं काय बरें?मन अम्मळ घट्ट केलें पाहिजे.

**दुर्गा**–दगडापेक्षां दिखील घट्ट केलें आहेग. पण सगळ्यांनींच मला झिटकारून टाकावें असें मी मेलें पातक तरी कोणतें केलें आहे; तूंच सांग बरें? देवाच्याच मनांत माझे विनाकारण हाल करावयाचे एवढेंच; पण त्याला तरी मी काय म्हणून बोल लावतें? पूर्वजन्मीचें माझेंच कांहीं पातक उभें राहिलें असेल तर तें भोगलें पाहिजे. अगदीं निमूटपणें भोगलें पाहिजे. असो, देवा! तूं दिनांचा दयाळू आहेस म्हणून तुझ्यापाशीं पदर पसरून मागतें कीं, माझे तूं पाहिजे तितके हाल कर, पण माझ्या अनाथ लेकरावर तुझ्या कृपेची सांवली असूं दे. माझें म्हणून त्याच्या आजासारखी तूंही त्याची छळणूक करूं नकोस. एवढी भिक्षा मला घातलीस म्हणजे माझें कांहीं अधिक मागणें नाहीं. ( सुसकारा टाकून. ) मी मेली म्हणतें, पण तसें कुठलें व्हायला! ( रडूं लागते. ) पायगुणाची पडलेंना मी! ज्याच्यावर म्हणून माझें वारें पडेल त्याचें कद्धीं चांगलें व्हायचें नाहीं. कोंडाऊ, तुझीच पाहिनास गोष्ट. तूं माझ्याजवळ राहिलीस म्हणून माझ्यासारखेच तुझेही हाल चालले आहेत कीं नाहींत. हीच जर दुसरी कुठे असतीस तर सुखांत असतीस.

**कोंडाऊ**–भलतेंच कांहीं तरी. माझे मुळींच हाल होत

नाहींत. यापेक्षां जरी आपल्यावर वाईट प्रसंग आला तरी मी आपल्यास सोडायची नाहीं. मरेपर्यंत तुमचीच चाकरी करीन.

**दुर्गा**—बरें बाई. तुझ्याही नशिबीं कष्टच सोसायचे आहेत म्हणून तुला अशी बुद्धि होते. कोंडाऊ, तुला खरेंच सांगतें कीं, आजपर्यंत मीं जीं दुःखें भोगलीं त्यांचा जर मला विसर पडेल तर पुढच्याबद्दल मी काडी इतकी दिखील काळजी करायची नाहीं. पण काय करूं ग! माझ्या मनांत नाहीं नाहीं त्या भलत्या विचारांनीं एकच गोंधळ करून टाकला आहे. बघावें तिकडे मेला अंधार दिसतो! आशा धरायला मेली जागाच उरली नाहीं. (इतक्यांत काळ्या येतो. त्याच्याकडे पाहून) काय बाबा! तुला पाठविलें होतें त्याचें काय करून आलास!

**काळ्या**—त्ये काय इचारू नगा बाइसाब! काम फिसाकल्याबानी झाल. त्यो मंजी आदुगर मारवाड्याचा बाप! नराम बोलून कस त्ये त्याला ठाव बी न्हे इचिभन. मला बगन्या बरूबर वागावानी गुरकाऊनच आला बगा अंगावर! तवा मी बी वाइसा न्येट केला. म्होर हकडल तकडल जरा रडगान लावूनशेनी मला म्हनूला—जा तुझ्या बाइला जाऊन सांग मागल्या डागिन्यावर आतां एक कवडी बी गावायची न्है. व्होवा असल पैसा तर दुसरा आनुनू ठ्येव तवा मिळल म्हनाव! इचिभन! सावकार म्हनूत्याती पन मांग है बगा बाईसाब. चोरावानी डोळा लावतुया मानूसावर!

**दुर्गा**—समजलें. त्याच्याकडे काय आहे दोष? माझेंच फुटकें नशीब माझ्या हात धुवून पाठीशीं लागलें आहे हें! घरांत अठरा विसवें दरिद्र, बाहेर देणेदारांचें देणें, नशीबाचे हे असे दिवे लागले आहेत, नी मेली आशा तर कसलीच उरली नाहीं! आतां माझी दशा तरी काय होणार देवा! (डोळ्यांतून पाणी काढते.) नाहीं म्हणायला ही एक आंगठी उरली आहे. इतके दिवस त्यांची आठवण ह्मणून प्राणापलीकडे जतन करून ठेवली होती. पण जळली या पोटाची आग विझवायला ती दिखील विकण्याची पाळी येऊन ठेपली! जा बाबा काळ्या. ही आंगठी

घेऊन जा नी त्या सावकारापाशीं ठेव. सगळ्यांनींच सोडलें, मग ही तरी कशी राहील ! ( काळ्या जातो. ) ( दुर्गा मुलास ह्मणते ) बाळ्या ! कां आलास बाबा माझ्या पोटीं ? तूं जन्माला आलास, तेव्हां सुद्धां मला इतके कष्ट झाले नाहींत, पण आतां तुझ्या मायेमुळें मला फार कष्ट होतात. माझ्या मरणाच्या भीतीपेक्षां तुझें पुढें कसें होईल ही मला मोठी भीति पडली आहे. ( कोंडाऊस ) पण तो कुठे माझ्याकडे पहातो आहे ? खेळाच्याच नादांत दंग होऊन गेला आहे. माझ्या पोटांत काय वणवा पेटला आहे तें त्याच्या गांवीं देखील नाहीं ! आणि तेंच बरें आहे बाबा ! ( क्षणभर त्याच्याकडे सचिंतपणें पाहून ) खरोखर अशा विचारांनीं मला खूळ लागेल. बरें विचार करून तरी काय उपयोग ? सुख नाहीं तें नाहीं, नी जिवाला उलटा त्रास मात्र अधिक होतो. ( इतक्यांत काळ्या धांवत धांवत येतो. )

**काळ्या**–लई वंगाळ येळ येऊन शेनी ठ्येपली बाइसाब !

**दुर्गा**–अरे असें झालें तरी काय ?

**काळ्या**–आंगठी घेऊनशेनी मी त्या सावकाराच्या घराकड निगालों इकुत्यांत वाटमंदीच त्यो मला भ्येटला. त्येच्या बरुबर दुसरची दोग तीग हैती. आपुन् घरी हैसा का म्हुन् मला इचारल. मी बी हैती ह्मंतल. तवा मला ह्मोर घालून त्ये माज्या मागून येऊन खालीं आंगनांत उच ऱ्हायल्याती कोतवालूच शिपाईबी हैती बरुबर. ह्मोर कंचा इचार ?

**दुर्गा**–विचार कसलान् काय कसलें घेऊन बसलास ? मेलें व्हायचें असेल तें होईल. कपाळीं लिहिलें असेल तितकें भोगलें पाहिजे ना ? ( इतक्यांत तुळाजीराव येतो. )

**तुळाजी०**–वयनी ! ज्यानें तुझ्या जन्माची माती माती करून टाकली त्या निर्दय बापाच्या पोटीं मी उत्पन्न झालों म्हणून तुला वयनी या नांवानें हांक मारायची सुद्धां मला लाज वाटते ! मी कसा आहे व बाबांचें हें निंद्य आचरण मला कितपत आवडतें याची तुला खात्री असेलच. मीं होऊन तें सांगितलें पाहिजे

असें नाहीं. बरें या अडचणीच्या वेळीं माझा कांहीं तुला उपयोग होण्यासारखा आहे का ? असला तर सांग. ( ती बोलत नाहीं असें पाहून ) बाबांचा मला विशेष संताप यायला आणखी एक कारण झालें आहे. तें कोणतें म्हणशील, तर आजचा हा वाईट प्रसंग तुझ्यावर येणार हें त्यांना पूर्वीपासून ठाऊक असून, त्यांनीं मला तुझ्याबद्दल जामीन होऊं नकोस म्हणून अगदीं निक्षून सांगितलें आहे. काय करूं ! मी मोठ्या पेचांत सांपडलों आहें. तुला प्रसंगी उपयोगीं पडूं कीं, बाबांची मर्जी संभाळूं ? हें तुला विचारतों. बाकी मला तर वाटतें कीं, या कामीं बाबांची सल्ला अगदीं कुचकामाची आहे.

**दुर्गा**–भाउजी, माझ्यावर तुमचें इतकें लक्ष्य आहे हेंच मी फार समजतें. आतां माझें तुम्हांला सांगणें इतकेंच कीं, त्यांनी मामंजींचें मन दुखविलें तर केवढा अनर्थ झाला हें लक्ष्यांत आणा, नी तुह्मीं तरी तसें करूं नका. नाहीं तर माझ्यासाठीं तुमचें मात्र नुकसान होईल.

**तुळाजी०**–तें खरें. बाबा एवढ्यावरून माझें नुकसान करायला मागें पुढें पहायचे नाहींत ही मला खात्री आहे पण अशा वेळीं जर मी तुझ्या उपयोगीं पडलों नाहीं तर तूं मला काय ह्मणशील, चार लोक काय म्हणतील, व माझें मन तरी मला काय म्हणेल ? ( इतक्यांत खालीं गलबला होतो ).

**दुर्गा**–भाउजी कुणी कांहीं म्हणत नाहीं. तुह्मीं उगीच माझ्याकरतां संकटांत पडूं नका.

**तुळाजी०**–बरें अगोदर ते खालीं ओरडत आहेत त्यांना दोन शब्द सांगून बघतों. तोंपर्यंत तूं कांहीं तोड काढून ठेव ( असें म्हणून जातो ).

**दुर्गा**–आतां कसली कपाळाची तोड काढूं ? दैवच काय करील तें करील. मरणाला सुद्धां मी भीत नाहीं. होय तर काय मेलें ! अगबाई ! ते आले वाटतें काळ ! ( कोंडाऊ, दुर्गा, मुलगा. सर्व आंतल्या खोलींत जातात ).

## प्रवेश ३.

( तुळाजीराव, आनंदराव, व शिपाईलोक येतात. )

**आनंदराव**–हां ! अशी बडाई करूं नका. कर्ज कर्ज काय तें हजार रुपयेच ना ? दहा हजार रुपये जरी असते तरी ते फेडून टाकण्याची माझ्या आंगांत ताकत आहे हें तुह्मांला ठाऊक असून असा दंगा कां करता ? तुमचा पैसा मी देईन. आहे काय त्यांत !

**शि० लोक**–आह्मांला तरी रावसाहेब आणखी काय पाहिजे ! त्यांनीं उलगडा केला काय, आणि आपण केला काय एकच.

**आनं०**–उद्यां या तर मग.

**शि० लो०**–( मुजरा करून निघून जातांना विचारतात. ) उद्यां खास ना ?

**आनंद०**–हो अगदीं खास.

दु०–( बाहेर येऊन ) उद्यां काय ? नी खास काय ? आज तेंच उद्यां ! कांहीं दुसऱ्याच संकटांत मला लोटणार वाटतें ?

**आनंद०**–छे छे ! संकटांत नाहीं आनंदांत लोटणार !

दु०–आतां मला या जगांत आनंदाची आशाच नाहीं उरली. रिकामी मेली जिवाला हुरहुर कशाला लावता ? काय आहे तें सांगानात ?

**तुळाजी०**–बायका भित्र्या ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. वयनी कर्ज कर्ज तें काय ; आणि त्यासाठीं इतका धीर सोडतेस ? त्या ह्मातान्याच्या तापट स्वभावामुळें मला कांहीं इकडे तिकडे करतां येत नाहीं, पण तुला दुसरा आधार देणारा कुणी नाहीं असें समजूं नकोस.

दु०–माझ्यासारख्या भिकारणीला कोण आधार देणारा मिळणार भाऊजी ?

**तुळाजी०**–असें कां ह्मणतेस ? असे तसे नव्हेत, अगदीं

जिवाचे आहेत समजलीस ? हे पहा आनंदराव ऐन प्रसंगीं तुला संकटांतून पार पडायला तयार झाले आहेत.

दु०–( किंचित् विचारांत पडल्यासारखें करून ) ते कसे मला पार पाडणार ? यांत त्यांचा मतलब काय तें तरी कळलें पाहिजे.

**आनंद**०–मतलब दुसरा कांहीं नाहीं. फक्त स्नेहासाठीं मी पुढें झालों. तुमच्यावर असा प्रसंग गुजरावा व मी तुह्मांला मदत करावी अशी माझी बिल्कुल इच्छा नव्हती; व हें कधीं माझ्या मनांत सुद्धां आलें नाहीं. कारण, दुसऱ्याच्या ऋणांत राहणें तुम्हांला आवडत नाहीं हें मला पक्कें माहीत आहे. त्यांतून माझ्या ऋणांत तर मुळींच नको.

दु०–( मनाशीं ) खरेंच नको.

**आनंद**०–माझ्याविषयीं तुमच्या मनांत शंका आली याबद्दल मला दिलगिरी वाटते. पण तुमच्याच गळ्याची शपथ घेऊन सांगतों कीं, तुमच्यावरचा प्रसंग टाळावा यावांचून माझा दुसरा कांहीं मतलब नव्हता. प्रसंगीं उपयोगीं पडेल तो स्नेही, हें मनांत वागवून मी तुह्मांला आज जामीन झालों. तात्पर्य काय कीं मला एकदां स्नेही असें माना; आणि मग तुह्मीं सांगाल तर माझ्या मनांतील पुष्कळ दिवसांची आशा आंतल्या आंत दडपून टाकून बैरागी होऊन कुठें तरी नि-घून जातों.

दु०–( आपल्याशीं ) हा यांचा उदारपणाच मला जाचणार बरें ! कांहीं मतलबाशिवाय हजार रुपयांवर पाणी सोडायला कोण तयार होणार !

**आनंद**०–( तिनें एकदम तोंड फिरविलेलें पाहून ) असें क-शाला ? मी तुमच्याकडे पहातों म्हणून जर तुह्मांला त्रास होत असला तर मीच जातों निघून ! पुनः तुमच्या दृष्टीस ह्मणून पडायचा नाहीं. ( उठून जाऊं लागतो. )

**तुळाजी**०–( त्यास थांबवून ) पण हें असलें दूर दूरचें बो-लणें उपयोगीं नाहीं. वयनी, मी तुला असें विचारतों कीं

आनंदरावांच्या बोलण्याचा खरा भावार्थ तुला कळला आहे का?

दु०—तो कळून पुष्कळ दिवस झाले. पण त्याचें काय ?

तुळाजी०—नाहीं, मीं ह्मणतों कीं, मी समजतों तोच जर त्यांचा हेतु असेल, आणखी तोच जर तूं बरोबर ताडला असशील, तर त्यांच्या मनोदयाप्रमाणें जुळून यावें हें मलाही बरें दिसतें.

दु०—ह्मणजे भाऊजी ! म्हणतां काय तुह्मीं ?

तुळाजी०—माझें ह्मणणें कांहीं वावगें नाहीं. हें पहा, तुझ्यावर हा असा प्रसंग आलेला ! तुझ्या खऱ्या आधाराचा खांब ईश्वरानेंच उपटून टाकला. माहेरचें कुणी उरलेंच नाहीं. इकडे सासरा हा अशा प्रकारचा ! मी आहें; पण माझेंही हात बाबांनीं जखडून टाकले आहेत. मुलगा तर अजून पांच सहा वर्षांचा बच्चा! प्राप्ति मुळींच नसून अंगावर कर्जाची रक्कम वाढत चाललेली ! बरें, कुठें तरी एखाद्या गरीबाच्या बायकोप्रमाणें दळण कांडण करून पोट भरावें तर लौकिक संभाळला पाहिजे? तेव्हां या सर्व गोष्टींचा जर पोक्तपणानें विचार केला, तर आनंदरावांचा व तुझा विवाह व्हावा हें मला इष्ट दिसतें.

**दुर्गा**—काय ! विवाह !

**तुळाजी**—हो. कारण असा योग पुनः जुळून यायचा नाहीं. या उप्पर जर तूं आपलाच हट्ट घेऊन बसलीस तर तुझेंही नुकसान, तुझ्या मुलग्याचेंही नुकसान. तेव्हां नीट विचार कर. ( कांहीं वेळ तिच्याकडे पाहून ) आतां कदाचित् तुझ्या मनांत ज्ञातींतील लोकांची भीति आली असेल तर तीही काढून टाक. कारण, शिंद्यांच्या घराण्यांत पाट लावायची चाल कांहीं नवी नाहीं. इतकें कशाला ? वयनी, तुला खात्रीनें सांगतों कीं, असें कांहीं झाल्यावांचून आनंदरावांच्या उपकारांचें ओझें हलकें व्हायचें नाहीं.

**दुर्गा**—( तुळाजीस ) त्यांचे माझ्यावर किती उपकार आहेत हें

माझें मला नाहीं का कळत भाऊजी ? ( आनंदरावाकडे पाहून ) तुमच्या उपकाराची फेड कशी करावी याच विचारांत आहे मी.

आनंद०-याला इतका विचार कशाला पाहिजे ? फक्त दोन शब्दांचें काम ?

दुर्गा-पण तुह्मीं मानतां तसें मात्र नाहींहो ! कारण, माझ्या मनांतील सुखाची होस, ते गेले त्या दिवशींच करपून गेली. इतकेंही असून जर तुह्मीं माझ्याशीं-(एकीकडे ) अगबाई ! मी कुणीकडे वहावलें ही ! नकोरे देवा ! ( उघड ) तुह्मीं जा आतां. ( असें ह्मणून एकदम निघून जाते. )

आनंद०-( निराश होऊन ) तुळाजीराव ! बोलतां बोलतां हें काय लचांड झालें ?

तुळाजी०-समजलों मीं काय झालें तें. अहो, या बायका आहेत बरें ! मी पूर्वी तुह्मांला सांगितलें होतें, त्यांतलाच हा एक बहाणा आहे. आधींच ओढून ताणून चंद्रबळ आणण्याचें यांना बाळकडूं असतें, त्यांतून दीर जवळ ह्मणून अधिक लाजली.

आनंद०-मग याला पुढें तोड ?

तुळाजी०-तोड कसली ! मी जातों घराकडे निघून. तुह्मींही आणखी अर्ध्या घटकेनें तिची गांठ घ्या ह्मणजे झालें. तिच्या मनांत आहे यांत कांहीं शंका नाहीं.

आनंद०-बरें तर, तोंपर्यंत मुरलीधराचें दर्शन घेऊन येतों. काय होईल तें तुह्मांला कळवीनच. ( दोघेही निघून जातात. पडदा पडतो. )

( अंक दुसरा समाप्त. )

# अंक ३.

—※—

## प्रवेश पहिला.

### स्थळ दुर्गाचा वाडा.

**पात्रें**—काळ्या व कोंडाऊ.

**काळ्या**—आमासारक्या गरिबाच लगिन घाटायच झाल, तरी बी कमित कमी पंद्रा रोज लागत्यात्, आन् ह्ये कस झाल ? काल सकाळच्या पारीं मी दाइचसा भाइर ग्येलो, आन् परत येतुया त्यो सगळाच रंग न्यारा दिसाय लागला. तुला दोन चार हाका मारल्या, पन् तू बी आपल्याच कामांत गरक्. आनंद्राव आल, त्येंच्या बरोबर गडीमानूस आली, आन् सगळीच घाई. मांडव घाला, उपाद्धुवाला हटका, अमक्यासनी बलावून करा, तमक्याला येउनशेनी या, अशी येकुच धांदल उडाली बग. सांच्यापारी होतुर लागून पार. पन् ह्ये सम्द जुळल कस ? इक्ती घाई कशापायीं ? आन् बाइसायची पाट लावाय कशा राजी झाल्या ?

**कोंडाऊ**—सगळें सांगतें. पण लग्नाच्या घाईसारखीच विचारायची घाई करूं नकोस. एकेक विचार ह्मणजे सांगते.

**काळ्या**—इळ न्हाइ म्हुन मी हाका मारनूया आन् येकेक इचार म्हन. बर, सांग बया. ह्ये म्हातुराच जुळल कवा ? येकुच सांग अदुगर.

**कोंडाऊ**—काल सकाळीं तूं बाहेर गेलास तेम्हां आनंद्राव इथें बसले होते ना ?

**काळ्या**—व्हय. अजारी मानसावानी वाइट तोंड करून बसल व्हत.

**कोंडाऊ**–मेल्या ! नुसते बसले होते असें म्हटलें असतेंस तर ! पण कुत्र्याचें शेंपूट, सरळ कसें होणार ?

**काळ्या**–तस न्हव. मी हत न्हाइल्यापुनू बगतुया, कधाबी आनंद्राव आल तरी गुमान बसत्याती. अस कशापायीं ?

**कोंडाऊ**–तुला आनंद्रावाची पूर्वीची हकीकत थोडीशी सांगितली पाहिजे. आमच्या बाईसाहेबांचे वडील **भगवानराव.** त्यांच्या मनांतून बाईसाहेबांना आनंद्रावाला द्यायचें होतें. व आनंद्रावाच्या मनांतही बाईसाहेब फार भरल्या होत्या. पण नवज्वराची भावना होऊन भवानराव एकाएकीं वारले, म्हणून तो बेत रहित झाला. ब्रह्मदेवाची योजना दुसरे ठिकाणीं होती, तिथें कोण काय करणार ? पुढें आनंद्रावही कांहीं दिवस आजारी पडले होते; त्या संधींत चंद्ररावांनीं बाईसाहेबांच्या मावशीकडून खटपट करवून घाईघाईनें लग्न उरकून घेतलें. आनंद्राव बरे झाल्यावर हें वर्तमान कळून त्यांना फार वाईट वाटलें, आणि त्याच तिडकेसरशीं त्यांनीं शपथ घेतली कीं मरेपर्यंत दुसरीशीं लग्न करणार नाहीं.

**काळ्या**–आं! एकाद्या रडव्या पोरावानी शपत घेयाच कंच कारन ? तिच्याच नशिबी न्हे झंगल आनू दिल सोडून. दुसरी तरनी गोरीपानू बायकु का गावली नसती व्हय ? इचिमन पैसा असल्यावर बायकासनी काय दुकाळ! रोज धा मिळत्याल व्होव्या तर.

**कोंडाऊ**–तें खरें, पण हें बघ काळ्या, त्यांचें काय नी कुणाचें काय ? एखाद्या ठिकाणीं एकदां मन जडलें म्हणजे तिथून निघून दुसरीकडे लागायचें मोठें कठीण. त्यांतून आनंद्राव पडले सरळ स्वभावाचे, खऱ्या अंतःकरणाचे. तूं म्हणतोस तसें दुसऱ्या एखाद्यानें केलें असतें. तें कांहीं असो; त्यांनीं त्या वेळीं शपथ घेतली खरी, पुढें वर्षा सव्वा वर्षानें चंद्रराव लढाईवर कसे गेले, कसे वारले, हें मी तुला सांगितलेंच आहे. ती खबर तुळाजीरावानें आनंद्रावाला कळवितांच त्यांच्या मनांत बाईसाहेबांबरोबर पाट लावायची इच्छा पुनः उत्पन्न झाली.

**काळ्या**–पन ह्ये अदुगर सांग मला–आनंदराव मंजी एकाद्या मानकऱ्यावानी थाटांत ऱ्हात्याती, घरानूदार दिसत्याती, आनू त्येंच्यांत पाटाची वायकु करत्यात का? थोर मराठ्यांत चाल न्है.

**कोंडाऊ**–अरे पैशानें थोर एरवीं कुळी हलकीच. लेकवळ्यांचीं घराणीं हीं. तुला नाहीं का माहीत?

**काळ्या**–कुनी सांगितल्याबिगार कस ह्माइत असतया? आतां झाल म्हाइत. पनू चंदरराव मरून आज सात वरस झालीं, आनू इक्त रोज आनंदराव का झोप घ्येत व्हते व्हय? तवाच पाट लावला असता तर आजपातुर दोन पोरग झाल असत.

**कोंडाऊ**–मेल्याची कल्पना विलक्षणच कांहीं तरी! सांगतें तें ऐकून घे, नी मग कल्पना करीत बैस हवा तर.

**काळ्या**–बर आतां तोंडाला मुसूक घालतो. सांग ह्मोर.

**कोंडाऊ**–चंद्रराव मेल्यावर चार पांच महिन्यांनीं, आनंदराव बाईसाहेबांकडे समाचाराला ह्मणून वरचेवर यायला लागले.

**काळ्या**–पनू मनांतला कावा मनांत अनू समाचार—

**कोंडाऊ**–ऐकरे अगोदर! पूर्वीपासूनच घरोबा होता, कांहीं नवीनच नाहीं जायला लागले. पुढें वर्ष दोन वर्षे दुःखांतच गेलीं; पण मग मुलाचे बाळखेळ पाहून बाईसाहेबांचें दुःख कमी व्हायला लागलें. नंतर आनंदराव मधून मधून, पर्यायानें गोष्ट काढीत होते. पण बाईसाहेब घट्ट मनाच्या, त्यांनीं ह्मणून कांहीं आनंदरावाची गोष्ट मनांत घेतलीच नाहीं. खर्चावेंचाच्या संबंधानें अडचण पडूं लागली, तरी त्या डगल्या नाहींत; तुळाजीरावानें पुष्कळ रदबदल्या केल्या, तरी मन वळलें नाहीं; परवां नुकते आनंदरावांनीं पदरचे हजार रुपये मोजायचे कबूल करून देणेदारांचें तोंड बंद केलें तेव्हां तर तूं होतासच. त्या दिवशीं देखील बाईसाहेबांनीं आनंदरावाच्या ह्मणण्याला रुकार दिला नाहीं—

**काळ्या**–मग इचिभन कालच्या कालच काय झाल तर! यका घटकच्या आंत! का भुतखेळ झाला का काय!

**कोंडाऊ**–भूतखेळापेक्षां अधिक. ऐक तर खरें. काल सकाळीं आनंदराव नेहमीप्रमाणें आले, बसले; तूं बाहेर निघून गेलास. मुलगा माडीच्या कठड्याशीं उघड्या अंगानेंच खेळत होता. मी मागच्या दारीं कांहीं काम करीत होतें.

**काळ्या**–तूं तकड होतीस, ह्यो हकड व्हता, ह्ये कुनाला व्होव ह्योर सांग—

**कोंडाऊ**–पुनः आणखी आपलें तेंच. कोणी कांहीं सांगत असलें ह्मणजे मध्यें मध्यें तोंड घालूं नये.

**काळ्या**–ऱ्हायल.

**कोंडाऊ**–मुलाला घालायला अंगरखा आणायचें निमित्त काढून बाईसाहेब तिथून उठून आंत गेल्या. बराच वेळ वाट पाहून, आनंदरावही घरीं जावें ह्मणून जिना उतरून चौकांत गेले. इतक्यांत 'अगबाई! मुलगा पडला, कोंडाऊ धांवग धांव' अशी बाईसाहेबांची किंकाळी ऐकून आनंदरावांनीं वर पाहिलें तों मुलाचा तोल जाऊन तो खालीं पडत होता, त्याला आनंदरावांनीं झटपट् धांवून वरचेवरच झेलला. हें पाहिल्याबरोबर बाईसाहेबांना जो आनंद झाला तो काय पुसूं नकोस. त्या आनंदाच्या भरांतच बाईसाहेब आनंदरावाला ह्मणाल्या कीं, "तुह्मीं माझा प्राण मला परत दिलात, तेव्हां हा देह आजपासून तुमचा झाला. हें करून सुद्धां तुमच्या आजच्या उपकाराची फेड व्हायची नाहीं." हे शब्द ऐकून आनंदरावाला तर स्वर्गसुख एकदम हातीं लागणार, असें झालें. झालें, संपलें तुझें विचारणें ?

**काळ्या**–बग इचिभन! कंच काम सादायच झाल मंजी अस एका खिनांत सात्त. नारायनाच करनन् दुसर काय! पन् इक्की घाई कां क्येली? ह्योर चार रोजान ह्योतुर बगितला असता तर?

**कोंडाऊ**–आनंदरावाला जोशीबुवांनीं सांगितलें कीं, पुढें मुहूर्त नाहीं, सिंहस्थ लागतो. कालचाच शेवटचा–( इतक्यांत

दुर्गा कोंडाऊला हाक मारते. ती 'ओ' ह्मणून उठून जाते. काळ्याही जातो.)

---

## प्रवेश २ रा.

### स्थल–जिवाजीराव कुंभ्यांचा वाडा.

पात्रें–जिवाजीराव व त्याचा पुत्र तुळाजीराव.

**जिवाजीराव**–काय ह्मटलेंस? तिचें आणि त्याचें लग्न झालें? कधीं? कुठें?

**तुळाजी०**–इथेंच काल संध्याकाळीं गोरज मुहूर्तावर झालें. मला तरी नुकेंच समजलें हें. आतांच मी घोड्यावर बसून असा मयनी रहाते त्या वाड्यावरून येत होतों. तेव्हां तिथें मार वाजंत्र्यांची गर्दी चालली आहे. माणसांची एकच धांदल उडाली आहे. कुणी आंत जातो, कुणी बाहेर येतो. हें पाहून सहज शोध केला तों हें प्रकरण! काय सांगूं बाबासाहेब त्या वेळीं मला फार वाईट वाटलें, व अंगाची लाही झाली. पण काय करूं? तोंड खालीं करून मुकाट्यानें इकडे निघून आलों.

**जिवाजी०**–यांत मला आधीं हें चमत्कारिक वाटतें कीं तिनें कबूल केलें कसें! दुर्दैव त्या आनंदरावाचें; झालें.

**तुळाजी०**–पुष्कळ दिवस वाटत होतें, आणि ह्मणे, एवढें मात्र एक ठरलें आहे कीं, तिनें आपला वाडा सोडायचा नाहीं. आनंदरावानेंच तिथें जाऊन रहावें.

**जिवाजी०**–जाऊं देत, दोघेही मरूं देत शिनळीचीं!

**तुळाजी०**–त्यांचें कांहीं फार दिवस पटायचें नाहीं, हें मी खात्रीनें सांगतों. आतां जरी तो आनंदाच्या शिखरावर बसून स्वर्ग काय तो त्याला अगदीं दोन बोटें उरला आहे, तरी चार दिवस जाऊं द्या कीं तो पडलाच खालीं ह्मणून समजा. पुढें त्याचें त्यालाच वाटायला लागेल कीं यांत कांहीं अर्थ नाहींरे नाहीं; कारण, ती स्वतःच्या हौसेनें कांहीं त्याला कबूल झाली नाहीं. अशी मला बातमी लागली आहे. मग खरें काय तें तिला

ठाऊक किंवा त्याला ठाऊक ! पण येवढें खास कीं, आणखी थो-डक्याच दिवसांत हीं गोष्ट त्याच्या मनांत टोंचायला लागून तो तिला कांहीं तरी भांडण काढून घरांतून हांकलून देणार !

**जिवाजी**०—तूं त्यांच्या लग्नाची गोष्ट मला सांगितलीस तेव्हांच माझ्या मनांत येऊन चुकलें हें. अरे, सांगून सवरून पां-ढऱ्या पायाची ती, तिचें कुणाशीं पटणार ! असो. पुढल्यास ठेंच मागला शहाणा, या ह्मणीप्रमाणें तूं मात्र अक्कल शीक. तुझ्या भावानें माझा शब्द मोडून पाहिजे तसे फंद केले म्हणून त्याचा परिणाम काय झाला तो लक्षांत आण, आणखी नीट माझ्याच तंत्रानें चालत जा. ह्मणजे परमेश्वराच्या कृपेनें तुला कांहीं कमी पडायचें नाहीं, समजलास ?

**तुळाजी**०—हें काय सांगायला पाहिजे मला! दादानें जितकें तुह्मांला दुःख दिलें त्याच्या दसपट मी सुख देईन. तुम-च्या हुकुमाबाहेर एक पाऊल देखील टाकणार नाहीं ; हीच शपथ!

**जिवाजी**०—शाबास ! असा वागलास तरच माझ्या पोटीं येऊन सार्थक; नाहीं तर काय ? असो ; पण तुळाजीराव, तुझ्या भावावर जरी माझा अतिशय राग होता तरी आतां काय त्याचें ? तो मेला, गेला पार झाला. त्याच्यावरचा राग कांहीं त्याच्या पोरावर काढायचा नाहीं, त्या पोराची मला फार काकळूत येते, किती झालें तरी नातवंडच तें ! कां नाहीं येणार बरें ?

**तुळाजी**०—माझ्या मनांतून हें तुम्हांला कधींच वि-चारायचें होतें कीं, त्या बापड्या पांच वर्षांच्या पोरानें तुम-चा काय अपराध केला ? त्या लेंकरावर तुमचा इतका राग कशासाठी ? पण ह्मटलें लहान तोंडीं मोठा घास घेऊं नये, ह्मणून उगीच राहिलों होतों. आतां तुह्मांलाच त्याची दया आ-ली, बरें झालें.

**जिवाजी**०—तेव्हां—कायरे ! हं—तेव्हां मीं काय ह्मणतों कीं, तूं भविष्य केल्याप्रमाणें आनंदरावानें जर त्या साडेसातीला वाटे-स लावली तर त्या अज्ञान लेंकराचे विनाकारण हाल होतील,

आणखी माझ्याच्यानें ते ऐकवायचे सुद्धां नाहींत. तर त्याच्या नांवावर कांहीं थोडी जमीन घेऊन ठेवावी, किंवा त्याच्या बेताची कांहीं रक्कम--

**तुळाजी**०-पण बाबासाहेब--आपल्या खऱ्या नातवंडाची काळजी बाळगून, अशी व्यवस्था करून ठेवणें कांहीं वाईट ह्मणत नाहीं मी-पण त्या मुलाविषयीं लोकांत कुजबुज ऐकली ती आपण आपली तुमच्या कानावर घालतों. म्हणजे--

**जिवाजी**०-कसली रे कुजबुज ? मूर्ख आहेत लोक.

**तुळाजी**०-मी नाहीं त्यांना मूर्ख म्हणायचा. कारण, दादांचें आणखी तिचें लग्न झालें, त्यापूर्वींच आनंदरावाचें तिच्या घरीं जाणें येणें असे. तेव्हां त्याचा आणि तिचा कांहीं चमत्कारिकच थट्टामस्करीचा प्रकार पाहून, तिच्या बापानें आनंदरावाच्या देखत 'एवढी थोरली झालीस तूं! आणि पुरुषांबरोबर काय अंगमस्ती करतेस ?' असें ह्मणून दोनचार वेळां तिला दरडावलें. असें झालें तेव्हां त्यानें तिथें जाणें बंद केलें.

**जिवाजी**०-बरें मग ? मुलाविषयीं कुजबुज करतात ती कोणती ?

**तुळाजी**०-बाबासाहेब, मला सांगायला शरम वाटते. वयनीला लग्नापूर्वींच एकदोन महिने गेले होते असें म्हणतात.

**जिवाजी**०-( रागानें ) तूं आहेस एक मूर्ख, आणि असें ह्मणणारे लोक आहेत शतमूर्ख ! अरे त्या मुलाचा तोंडवळा आणखी चंद्ररावाचा तोंडवळा अगदीं सारखा दिसतो, हें नाहीं वाटतें तुझ्या लक्षांत आलें ?

**तुळाजी**०-( बाप रागावला असें पाहून ) हो हो! तें कधींच मीं पाहिलें आहे, इतकेंच नव्हे, तर तुमच्या आणि त्याच्या, माझ्या आणि त्याच्याही चेहऱ्यांत साम्य दिसतें, पण लोक काय ह्मणतात तें मी तुम्हांला कळविलें.

**जिवाजी**०-( संतापून ) झक मारतात लोक ! मी आतां अगोदर माझ्या नातवाची कांहीं तरी तरतूद करून टाकतों. वास्त-

विक ह्मटलें ह्मणजे माझ्या मागें तो निम्याचा मालक. परंतु त्या साडेसातीच्या पोटीं आला ह्मणून त्याची चवथाई बुडवून बाकी चवथाईचा मालक त्याला करतों, आणि तुला तीन हिश्शांचा. जातों तर. आतां त्याच उद्योगाला लागतो. ( असें ह्मणून निघून जातो. )

तुळाजी०—( आपल्याशीं ) हें पाहिलें! तें कारटें मला बाधक होणार ह्मणून ह्मणत होतों, तो प्रसंग शेवटीं येऊन ठेपलाच! ( वेडावून दाखविल्यासारखें करून ) ' त्यापोराची मला काकळूत येते ! ' वः बाबासाहेब! तुमच्या कोमळ अंतःकरणाची कमाल आहे. ! ! परमेश्वरानें मनुष्य तरी एक विचित्र प्राणी निर्माण केला आहे. प्रत्यक्ष त्या पोराची आई किती पायां पडली, किती काकुळतीला आली, किती रडली! तरी या फत्तराला तिची दया आली नाहीं. कां? तर म्हणे ती पांढऱ्या पायाची आहे, तिनें माझें घर बसविलें! आणि त्याच साडेसातीच्या पोटचें हें कारटें असून त्याच्या साठीं आमच्या बाबासाहेबांचें मन कळवळतें ! काय चमत्कार आहे पहा ! पण मी आतां कशाला बोलूं? म्हातारा काय काय करतो तें करूंदे. त्याच्या अकलेवर हिकमत लढावायचें काम माझें! मी जो येवढा व्यूह रचला आहे तो चवथा हिस्सा त्या पोरट्याला देण्याकरितां नव्हे ह्मणावें.—बरें, आतां आपल्याला अगोदर आनंदरावाकडे पानसुपारीला गेलें पाहिजे. कारण, मित्रत्वाची वरवर रेलचेल करून आपला मतलब साधून घ्यायला आपलें काय जातें? अंदरकी बात राम जाने! ( असें ह्मणून निघून जातो. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ—दुर्गाच्या वाड्यांतील दिवाणखाना.

( एका बाजूस कलावंतिणीचा नाच चालला आहे. दुसऱ्या बाजुस आनंदरावाचे कांहीं मित्र बिछायतीवर लोडाशीं टेंकून

बसले आहेत. वरचेवर पानसुपारी, अत्तरगुलाब चालला आहे. आनंदरावाचे मित्र मधून हळूच त्याची थट्टा करीत आहेत, व तोही त्यांस आनंदानें उत्तरें देत आहे. अशा वेळेस तुळाजीराव प्रसन्न मुद्रा करून लगबगीनें येतो. सर्वजण त्यास 'या या,' ह्मणून योग्य ठिकाणीं बसवितात. त्यास अत्तरगुलाब वगैरे दिल्यावर लौकरच नाच बंद होतो.)

**आनंद**०–वः तुळाजीराव! अगदीं आज वेळेवर आलांत ना? तरी मित्र! तरी सांगून ठेवलें होतें!

**तुळाजी**०–झाला खरा बुवा थोडासा उशीर. पण इलाज नाहीं. अगदीं यायला निघालों, आणि बाबासाहेबांच्या पोटांत जी तिडीक उठली ह्मणतां––

**आनंद**०–(मध्येंच) हा सर्व प्रकार त्यांना कळला कां?

**तुळाजी**०–होय. कालच कळला.

**आनंद**०–तरीच तिडीक उठली बरें का!

**तुळाजी**०–(हंसून) छे छे! मग मी तसाच वैद्यबुवाकडे गेलों. त्यांनीं मात्रा दिली ती उगाळवून बाबासाहेबांना देवविली. तेव्हां त्यांची तिडीक दबली, आणि मी इकडे आलों. ह्मणून जरा उशीर झाला. नाहीं तर अशा वेळेला का मी राहिलों असतों!

**आनंद**०–काय राहिलों ह्मणतां! दुसरें काय, तुह्मीं असतां ह्मणजे तितकी मजा झाली असती.

**तुळाजी**०–अहो, आतां काय मजेला कमी! (हळूच) मजेचें झाडच तुमच्या हातीं लागलें आहे. सांगितलें तर तुह्मांला खोटें वाटेल, पण पोटांत मावत नाहीं म्हणून सांगतों कीं, या विवाहाबद्दल तुमच्यापेक्षां देखील मला अधिक आनंद झाला आहे!

**आनंद**०–यांत मोठें नवलच सांगितलेंत! जिवलग मित्राला जर आनंद होऊं नये तर व्हावा कोणाला? माझें सुदैव आणि तुमची खटपट, मग काय कमी?

**तुळाजी०**-खटपट कसली त्यांत ? बरें, जरी केली तरी काय परक्यासाठीं केली ? परंतु हें पहा तुह्मांला आनंदराव हें नांव आतां खरें शोभूं लागलें.

**आनंद०**-खरेंच ! ( हंसून ) आणि दुसरीही तशीच गंमत पहा कीं, तुमच्या वयनीचें--आतां दुहेरी वयनीचें-पहिलें नांव दुर्गा. म्हणूनच एकादा दुर्ग हस्तगत करून घ्यायला जितके प्रयास पडतात त्याच्यापेक्षां सातपट प्रयास ही दुर्गा हस्तगत व्हायला पडले !

**तुळाजी०**-मी तुह्मांला सांगत नव्हतों कीं, पाठ सोडूं नका. सात वर्षे आराधना केलीत, पण शेवटीं प्रसन्न करून घेतलीत. ( इतक्यांत भोजनाची तयारी झाल्याची वर्दी आल्यावरून सर्व-जण उठून जातात. )

---

## प्रवेश ४ था.

### स्थळ-दुर्गाच्या वाड्यांतील एक खोली.

**पात्रें-काळ्या** ( भडक पोषाक केलेला ) व **कोंडाऊ.**

**काळ्या**-ह्यो मातुर आमास्नी लइ नामी धनी घावला बग ! ह्योरल्या ह्यैन्याला साच बारा रुपइ व्हनार असं माझ्या हान्या-मंदीं आलया. योकच दिस झाला. पन दिलू अक्शी नामी दि-सतुया. ह्ये मला लग्नाच मुंडास बांधल, ह्ये धोतराच पान आप-ल्या हातान माज्या अंगावर घातलं. आमी चाकरमानूस, पन अमासंगबी गुळावानी गुळमट बोलून. बाईसायबांचा मातुर नूर वाइस न्यारा दिसतोया. परक्यावानी परक्याचानी कर-त्याती. त्येंच जर का मन खुस झाल तर आमावानी खुसमौज आमीच बग.

**कोंडाऊ**-त्या हंसाखेळायला लागल्यावर रावसाहेबांना आ-णखी काय पाहिजे !

**काळ्या**–दोन रोज थाइस. बिचाकल्यावानी करत्याल, झोर आपसुक वळनावर येत्याल बग.

**कोंडाऊ**–बरें, कारे जिवाजीरावानीं तुला वाड्यांतून हांकलून दिलें तेव्हां तूं ह्मणत होतास कीं, त्यांनीं माझा गळा कापल्यासारखें केलें. तर ते पुनः तुला चाकरीला ठेवतात, जातोस का ? इथल्यापेक्षां जास्त पगार मिळेल ; बघ !

**काळ्या**–नगर दादा ! उपाशी म्येलो तरी बी फिकीर न्हे, पनू तत जान नग आता. तवादूरन म्या न्योमच करून टाकलाया. घरीं बाइल असल्याबिगार आगी लंड पिची लंड अशा सडकसीतारामाजवळ परान गेला तरी बी चाकरी न्हायाचा न्हे !

**कोंडाऊ**–तें कारे ?

**काळ्या**–तशा मानसाली कदी चैनच न्हे बग. जवातवा पिसाळल्या कुत्र्यावानी अंगावर खिसाकल्यात. इळभर गडीमानसाची आईमाई काडत्यात. कामाची बी लइ घासगीस. ह्मेच यकांदी चटकदार बायकु असली मंजी सारा येळ खुसमौजमंदी असत्यात. त्यो ह्मातारा मला कस ह्मंतो ( जिवाजीरावाप्रमाणें बोलून व मुद्रा हातवारे करून ) "जा तिकडच. पुना ह्यो उंबरा चढलास तर पाय मोडीन, असल्या ह्मन मगरूर चाकराची मला जरूर न्हे !." बग कीं आं ? मग असल्या पिसाट धन्याची हत कुना ल्योकाला अगत है. रागारागान माज कांबळ फ्येकुन दिल, आनू मला रस्याला धधरून वाड्याभाइर घालिवल. का कसा है ह्मातारा ! ह्योच जर का तरना असता तर मला जिवबी मारल असत !

**कोंडाऊ**–तरी ह्मातारा बरें ! म्हणूनच सांगतात ना कीं, तरण्याताठ्या पुरुषांनीं बायका करून असावें. तींच लग्नें झालीं नसलीं कीं, इकडे धांव, तिकडे धांव, इथे हुंग, तिथे हुंग असें करायला लागतात. खरेंच काळ्या, अजून तूं कांरे बायको केली नाहींस ?

**काळ्या**–हुं ! बायकु करतो ! बायकु झाडाला चिकाटलिया

जनु ! का शेनामातीची करूं ! बायकुला रुपई लागत्यात गाडग-भर. त्यापाइ कुट दरुडा घालू व्हे? आनू व्हे ह्येबी बेस है तिची-भन. व्हे तर मी ध्याचाबी हतच व्हानार, आनू राच्चाबी हतच व्हानार. आनू ती व्हानार थत. कस जुळतया? तिन तकड रंग मारावा, आनू म्या हकड—( कोणी आलेंसें पाहून ) अग राव-साब येत्याती. घाई दिसतीया. बाइसायबाकड जात्याती जनु. चल आपुनबी कामाला लागू. ( असें ह्मणून जातात. )

---

## प्रवेश ४ था.

### स्थळ--दिवाणखान्याची खोली.

**दुर्गा**–( मनाशीं ) अविचार ह्मणजे दुःखाचें माहेर, असें जें ह्मणतात तें मेलें कांहीं खोटें नव्हे. आनंदरावांनीं माझ्या बाळ्याचा प्राण वांचविला, त्याबद्दल आनंदाच्या भरांत मीं त्यांना आपली काया अर्पण केली. हें माझें करणें चांगलें कीं वाईट याचा मला त्या वेळीं कांहीं विचार झाला नाहीं. पटूकनू तोंडांतून शब्द निघून गेले. बरें पण माझ्या हातून तें पाप झालें कीं काय? पाप ह्मणावें तर आनंदरावाचे उपकार फेडायला मला दुसरा उपायच सुचला नाहीं त्याला मी तरी काय करूं? ( किंचित् विचार करून ) बरें, केलें तें जर चांगलें ह्मणावें तर मनाला रुखरुख कां लागली आहे? बोलतें, चालतें पण काल-पासून चैन नाहीं. मी कांहीं तरी मोठें पातक केलें असें राहून राहून मनांत येतें. आणखी तेंही मेलें खरेंच. कारण, हें शरीर दुसऱ्याला देणार मीं कोण? याचे धनी दुसरेच आहेत-- होते कां होईना--पण ( इतक्यांत आनंदराव घाईघाईनें येतो. दुर्गा उभी राहते. )

**आनंद०**–( सचिंत ) मला अत्तांच्या अत्तां निघालें पाहिजे. हें पहा त्याचें पत्र. त्याचे नुसते हाल चालले असतील.

जीव घुटमळत असेल. मला पाहिल्याशिवाय त्याचा प्राण सु-खांत जायचा नाहीं.

दु०–असें मेलें एकाएकीं काय झालें असावें बाई! तिकडे तो मोठा उपद्रव तर नाहींना मेला?

**आनंद**०–तें कांहीं लिहिलें नाहीं. पण मला भेटण्याकरितां येत होता. **अमीरपूर** सोडून दुसऱ्या मुक्कामाला आला तोंच अगदीं जेर होऊन पडला. एका गड्याशिवाय दुसरें कोणीच जवळ नाहीं. दुसरा गडी होता तो पत्र घेऊन इकडे आला. मला तर आतां गेलेंच पाहिजे. पण तुला सोडून जायचें ह्मणजे प्राणच सोडून जायचें असें मला झालें आहे. काय करूं!

दु०–खरेंच. ते वाटेंत आजारी पडले, हें कांहीं मेलें चांगलें नाहीं झालें!

**आनंद**०–असो, इलाज नाहीं. पण एक गोष्ट माझ्या मनाला खाते. ती ही कीं, कालपासून मी तुझें तोंड हंसरें असें केव्हांच पाहिलें नाहीं. विनोद नाहीं, गोड बोलणें नाहीं, कांहीं नाहीं; ह्मणून माझें धैर्य जास्त खचतें. (इतक्यांत तुळाजीराव येतो.)

**आनंद**०–कां, मंडळी गेली का? त्यांना सोडून तुह्मी कसे आलांत इकडे?

**तुळाजी**०–तर काय करूं? पत्र वाचतांच वाईट तोंड करून उठून आलांत, तेव्हां त्यांत कांहीं आनंदाची खबर नाहीं असें समजून मंडळी उठून गेली; ह्मणून काय प्रकार आहे तो पाह-ण्याकरितां मी इकडे आलों. पण कोणाकडून आलें पत्र तें? कांहीं––

**आनंद**०–ध्यानीं मनीं देखील नव्हता असा अनर्थ येऊन कोसळला. हें पहा वाचून.

**तुळाजी**०–(पत्र वाचीत) काय **गुणाजीराव** बेमार आहे-त! अरे अरे अरे!! तुह्मांला भेटायाला येत होते? काय पहा नशीब! मग तर आतांच तुह्मांला घोड्यावर बसलें पाहिजे!

**आनंद**०–हो, सामानसुद्धां चढवायला सांगितलें. गुणाजी-रावांसारखे भाऊ मिळणार नाहींत, तुळाजीराव !

**तुळाजी**०–पण वयनीचा रुकार पडला का ? कां वयनी ?

दु०––गेलेंच पाहिजे ह्मणतात. मी कशी नको ह्मणूं ?

**आनंद**०––हें शरीर जाणार पण प्राण मागें रहाणार !

**तुळाजी**०––तुमच्या बंधूची प्रकृति बरी असली तर तात्र-डतोब यालच त्यांना घेऊन; नाहीं तर––( इतक्यांत मोतद्दार घोडा तयार आहे म्हणून सांगून जातो. )

**आनंद**०––बरें तर येतों आतां हं. तुळाजीराव, तुह्मी तर भावासारखेच आहांत, तेव्हां जास्त काय सांगायचें ! मी परत येईपर्यंत इथें तुमचा बंदोबस्त. माझा प्राणच तुमच्या स्वाधीन आहे असें समजा ह्मणजे झालें.

**तुळाजी**०–त्याची तुह्मीं बिलकुल काळजी करूं नका. ( ए-कीकडे ) तुमचा प्राण माझ्या स्वाधीन आहे हें मी कधींपासून जाणून आहे ! ( आनंदराव निघाला, त्यांस पोंचविण्याकरितां दु-र्गा जाऊं लागली. )

**आनंद**०––नको नको. थंडी फार आहे. कशाला येतेस बाहेर ? जा, जाऊन नीज जा. कुणी पोंचवायला आलें ह्मणजे परत यायला उशीर लागतो. खरेंच जा. मी बहुतकरून उद्यांच येतों परत.

दु०–बरें, नीट संभाळून चला. रात्रीची वेळ आहे. वाटही नीट नसेल–

**आनंद**०–छे छे ! आतां चांदणं पडेल. भीति नको बाळगूं. ( असें ह्मणून तुळाजीराव व आनंदराव निघून जातात. )

दु०–अग बाई ! माझें मन एकाएकीं असें उदास कां बरें झालें ! आणखी मेलें कांहीं अरिष्ट यायचें आहे कीं काय कोण जाणे ! मी मोकळ्या मनानें वागत नाहीं ह्मणून आनंदरावांना फार वाईट वाटतें खरें; पण मी तरी काय करूं ? मनाला मेली कसली ती हौसच वाटत नाहीं. माझ्या मनांत कांहीं कपट अस-

लें तर देवा ! त्याला तूंच साक्षी आहेस. बरें, पडतें आतां जाऊन अंथरूणावर. घटकाभर डोळा लागला तर तेव्हढेंच बरें वाटेल मनाला. ( निघून जाते. )

( अंक तिसरा समाप्त. )

---

# अंक ४ था.

## प्रवेश पहिला.

स्थळ रस्ता.

पात्रें-चंद्रराव ( दुर्गाचा पहिला नवरा )

व सोमाजीराव ( त्याचा मित्र. )

**चंद्रराव**-दिवस कितीही मोठा झाला, आणखी सूर्याचा ताप कितीही प्रखर असला, तरी शेवटीं आनंददायक सायंकाळ हा व्हावयाचाच—तसा आमचा प्रकार झाला. आज सुमारें सात वर्षे आपण कैदेंत कष्ट भोगले, पण अखेरीस भोक्तृत्व संपतांच तशा बिकट ठिकाणांतून देखील आपली अकस्मात् सुटका होऊन, आपण पुनः घरीं आलों कीं नाहीं ?

**सोमाजी०**-ज्या दिवशीं आह्मीं त्या शिपायाला ठार करून तटाची भिंत उडून खालीं मैदानांत आलों, त्याच दिवशीं आपण घर गांठलें. बरें, हाच गणेशपेठेचा रस्ता नव्हे का ? मी जातों तर आतां. त्या वडाच्या पलीकडचा आमचा वाडा, पण तुह्मीं कोठें जाणार ? वडिलांकडेच ना ?

**चंद्रराव**-छे ! अधींच माझ्यावर त्यांचा राग, त्यांतून तुकाजीरावांचीं पत्रें तुह्मीं वाचीतच होतां. तेव्हां तिकडे जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, पण कांहो सोमाजीराव, इतक्यांत या माझ्या वैराग्याच्या वेषावरून मला पाहिल्या बरोबर कुणी ओळखील का ?

**सोमाजी०**–मला तर वाटतें कीं, साधारणपणें कांहीं कुणाला ओळखतां यायचें नाहीं, अगदीं संघट्टणांतीलच कुणी मनुष्य असेल तर सांगवत नाहीं. खरेंच, बैरागी पण हुबेहूब बैरागी दिसतां !

**चंद्रराव**—तुम्हीं चला आतां. माझ्या नवीन चिन्हाडाचा पत्ता म्हणजे मुरलीधराच्या मंदिराजवळ–उजव्या बाजूला कोंपऱ्यावरचा दुमजली वाडा—

**सोमाजी०** —आला लक्षांत ! सकाळीं येतों मी तुमच्याकडे. ( सोमाजीराव जातो. चंद्रराव कांहीं वेळ फिरून आपल्या वाड्यानजीक येतो. )

**चंद्रराव**—हा दिवस कधीं येईल असें झालें होतें तो एकदां आला. आतां माझ्या मनांत आहे त्याप्रमाणेंच जर इथली सर्व व्यवस्था ठीक असली, तर माझ्या आनंदाला पारावारच नाहीं. मग इतके दिवस भोगलेलीं दुःखें एका क्षणांत विसरून जाऊन मोठ्या सुखांत राहीन. दरवाज्याजवळ येऊन दरवाजा खडखडावतो, व ' कोण आहे ? कडी काढा ' असें ओरडतो. कोणी आलें आहे असें पाहून काळ्या उठून पहाण्याकरितां येतो. )

**काळ्या**—आं ! कोन है त्ये ?

**चंद्रराव** —दरवाजा तर उघड आधीं, मग सांगतों.

**काळ्या** —( दरवाजा उघडून बाहिर येत येत ) इचिभन ! चाकरी न्हव, कार है ह्यो ! वाइचसा कुठ डोळा लागतोया त्यो ' दार उगड. ' है काय ह्ये ? ( चंद्ररावास ) कोन् हैस तूं ?

**चंद्रराव**—तुझ्या धनिणीला झोंप लागली का ?

**काळ्या** —( नीट न्याहाळून पाहून ) अर ह्यो कोन गोसावडा है. कार! इक्त्या रात्र का आलास भिक मागायला ?

**चंद्रराव**—( आपल्याशीं ) हा कुणी नवाच चाकर ठेवल्यासारखा दिसतो. ( उघड ) अरे बाबा मी गोसावी दिसतो, पण खरा गोसावी नव्हे; माझें एवढें काम कर म्हणजे वास्तविक प्रकार तुला आपोआप कळेल

**काळ्या**—( डोलानं ) अर चल ! मोठा ल्योक आलाया काम सांगायला ! अमिराचा नातू ! सकाळच्या पारीं ये, मंजी वंजळभर आटा घालीन जा. त्येच ल्येका तुज काम, आन् दुसर कंच असतया. जा, पड जा धरमसाळत जाऊन ! ( असें ह्मणून दार लावूं लागतो. )

**चंद्रराव**–अरे, तुला एक रुपया देतो हा घे. आणि तुझ्या बाईसाहेबांना जाऊन माझा निरोप कळीव. त्यास म्हणावें, कांहीं जरूरीच्या कामाकरितां तुम्हांला कुणी भेटायला आला आहे. ( रुपया काढून देतो. )

**काळ्या**–( रुपया फेंकून देऊन ) कार ये गोसावड्या ! मला का कुत्र्यावानी समजलास व्हय ? चोक भाकरीचा तुकडा फ्येकला मंजी त्यो गप बसतुया. मी तसा न्हव. जा गुमान आपल्या वाटन. इतक्या रात्र आमच्या बाईसाब कुनाची गांठ घेत न्हाइत. चल–कूवांग लावलयां हत. ( त्याच्या हाताला धरून दूर घालविणार इतक्यांत कोंडाऊ येते. )

**कोंडाऊ**–हें ! कुणाशीं हुजत घालीत बसला आहेस तो ? थोडकें बोलून काम होत नाहीं वाटतें ? तुला किनई, ज्याच्या त्याच्याशीं वटवट करायची फार संवय लागली आहे. कोण आलें आहे तें ? ( चंद्ररावाकडे न्याहाळून पाहून ) कां बुवा, इतक्या रात्रीचे कुणाकडे आलांत ? काय काम आहे ? कुणाशीं बोलायचें आहे ?

**चंद्रराव**–बाई, तूं केलेंस तर तुझ्याकडेच आहे. मला तुझ्या बाईसाहेबांची गांठ घ्यायची आहे.

**कोंडाऊ**–पहातें बरें त्यांना विचारून; पण बाईसाहेबांची गांठ घेतलीच पाहिजे का ? काय काम आहे तें माझ्या हातून नाहीं का होण्यासारखें ?

**चंद्रराव**–( हिरमुसलें तोंड करून ) होईल, पण मला हवें तसें नाहीं व्हायचें. बरें, ही आंगठी नेऊन दाखीव ह्मणजे काय काम आहे, त्यांना समजेल. ( आंगठी काढूं लागतो. )

**कोंडाऊ**–( आपल्याशीं ) हा कुणी गोसावी दिसतो आहे; पण बोलण्यावरून कांहीं गोसाव्यासारखा वाटत नाहीं. मग काय असेल तें ईश्वराला ठाऊक ! ( आंगठी घेऊन ) मेली ही आंगठी भारली बिरलेली नसेल ना ? नाहींतर काय म्हणतात कीं नाहीं त्यांतली गत, करायला जावें एक, आणि व्हायचें भलतेंच. ( चंद्ररावास ) या आंगठीवर कांहीं भलतें सलतें ना-हींना लिहिलेलें ? तुझ्या तोंडावरून कांहीं तसें दिसत नाहीं ह्मणा, पण आपलें विचारलें ! थांब थोडासा. मीं ही त्यांना दाखवून आणतें.

**काळ्या**–( चंद्ररावाकडे सशंकपणें पाहून मोठ्यानें ) अग या गोसावड्याचा कावा काइ न्याराच दिसतोया वर का ! काय अदिक उन झालं तर मला दकल न्है बग. हां ! राच्या बकोत हाय, ती आंगठी दावाय न्हेउ नगस. म्होर म्या सांगितलं न्है म्हनूशील !

**कोंडाऊ**–बरें, सांगितलें होतेंस ह्मणेन, झालें ? ( निघून जाते. काळ्या चंद्ररावाकडे टवकारून पाहात दरवाज्यांत उभा रहातो. )

**चंद्रराव**–( आपल्याशीं ) ही आमची म्हातारी कुळंबीण ! इनें कांहीं मला ओळखलें नाहीं. हा गडी तर नवाच आहे ह्मणा. या दोघांची ही सावधगिरी पाहून मनाला आनंद होतो. असो; थोडा अडाणीपणा करतात, पण तो देखील मी एक चांगलाच म्हणतों. ( इतक्यांत कोंडाऊ येते. तिला पाहून ) कां ? कसें काय झालें ?

**कोंडाऊ**–मी ती आंगठी दिली त्यांच्यापाशीं. कांहीं वाईट वर्तमान आणलें नाहींस एवढें एक बरें केलेंस.

**चंद्रराव**–वाईट तर नाहींच नाहीं. ती आंगठी पाहून त्यांना फार आनंद झाला असेल.

**कोंडाऊ**–हो, झाल्यासारखा दिसला खरा. पण आंगठी पहा-तांच बाईसाहेब एकदम चपापल्या. मग काय असेल तें असो.

चें आंत ये अगोदर, मी दरवाजा लावतें. किती झालें तरी मी मेली कुळंबीण पडलें, म्हणून म्हणतें कुणी पाहिलें तर उगीच भलतीच शंका घ्यायचे. मी पुनः त्यांच्याकडे जाऊन त्या काय म्हणतात तें तुला कळवितें. तोंपर्यंत तूं सद्रेवर बैस म्हणजे झालें.

**चंद्रराव**—तरी चालेल. ( ती जाते. ) देवा ! केव्हां एकदां जाऊन कडकडून आलिंगन देईन असें झालें आहे. आणखी दहापांच पळांनीं मी आनंदाच्या कळसावर जाऊन बसेन नाहीं ! परमेश्वरा, धन्य आहे तुझी ! माझें मन आणि शरीर जशीं काय सज्जच होऊन बसलीं आहेत. ( जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—दुर्गाच्या माडीवरील दिवाणखाना.

( हातांत आंगठी असलेली दुर्गा. )

**दुर्गा**—( मनाशीं ) आजपर्यंत जादूगिरीच्या, मणीमंत्राच्या, तशाच छांछूच्या मी पुष्कळ गोष्टी ऐकल्या आहेत. भारलेला ताईत देहाला बांधून, नाहीं तर मेली कांहीं तरी जादू करून, हे मांत्रिक लोक पाहिजे त्याला मोहनी घालतात, आणि आपल्याला पाहिजे तें त्याच्यापासून घेतात. तसेंच, मंत्र जपून भलत्याच दिवशीं चंद्रसूर्याला ग्रहणें सुद्धां लावतात. एक का दोन. असे पुष्कळ चमत्कार घडतात म्हणून आमची आजी लहानपणीं सांगत असे. तेव्हां " असें कसें होईलग ! उगीच कांहीं तरी सांगतेस ? " असें म्हणून मी तिला हंसत होतें. पण आतां तें मेलें सगळें मला खरें वाटायला लागलें. हेंच पाहना ! ही एवढीशी आंगठी ! पण इच्याकडे पाहिल्याबरोबर पूर्वीं भोगलेलें सर्व सुख कसें माझ्या डोळ्यापुढें उभें राहिलें ! ( जरा चपापून ) अगबाई ! ( एकसारखें त्या आंगठीकडे पाहून ) ही हातांत घेतल्यापासून माझ्या मनांत नाहीं नाहीं त्याच कल्पना येऊं लागल्या हें काय !

एकदां आनंद झाल्यासारखें वाटतें, लगेच भीतिही वाटते ! आ-तां–नको मेला, तो विचारच नको–( इतक्यांत कोंडाऊ येते. )

**कोंडाऊ**–तो बुवा सदरेवर उभा राहिला आहे, त्याला काय सांगायचें ?

दु०–खरें, तें मी विसरलेंच कीं ! जा, त्याला वर घेऊन ये. ( कोंडाऊ जाते. दुर्गा आपल्याशीं ) देवा ! अरे ही त्यांच्या बोटां-तली आंगठी इथें कशी आली ? चाळापूरच्या लढाईंत त्यांचा अंत झालाना ? ( थोडा विचार करून ) आणि ह्मणूनच मी हें दुसरें लग्न केलेंना ? छे बाई ! ही आंगठी पाहिल्यापासून मरणा-ची बातमी खोटी कीं काय असें वाटायला लागलें आहे. ( सु-स्कारा टाकून ) देवा ! ते लढाईंत पडले अशी मनाची कशी तरी समजूत घालून मी पुढचे दिवस काढूं कारे ! ( किंचित् विचार करून ) नाहीं त्यांचा अंत झाला हेंच खरें. अंतकाळीं कुणी स्नेही जवळ असेल वाटतें, आणि मला पोंचवायासाठीं ही आंगठी त्या-च्यापाशीं दिली असेल, तो ही घेऊन आला आहे, हेंच खरें. पण आलेला गोसावी–( चंद्रराव येतो. दुर्गा त्याच्याकडे न्याहाळून पाहून आपल्याशीं ) 'मन चिंती तसें वैरी चिंतीना' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. उगीच मेल्या इतक्या वेळ भलभलत्या शंका घेत बसलें होतें. सर्व खुणा जमतात. देवा तेच हे ! ( आनंदानें ) माझा प्राणाच मला मिळालाग बाई !

**चंद्रराव**–( ती आपल्याशीं कांहींच बोलत नाहीं असें पाहून) मला तूं ओळखलें नाहींस असें दिसतें !

दु०–कुणाला ? आपल्याला ओळखलें नाहीं ?

**चंद्रराव**–( आनंदानें ) तर मग या बैराग्याच्या वेषाला नि-रोप देतों आतां. ( झोळी वगैरे फेंकून देतो. ) आज माझीं सर्व दुःखें संपलीं. एकदां कडकडून आलिंगन दे पाहूं. ( असें ह्मणून तिला धरावयास जातो. ती मोठ्यानें ओरडते, व नवऱ्याच्या हा-तांत सांपडतांच तिचें भान जातें. ) हें काय बरें ! ( वारा घालतो.)

लाडके ! लाडके ! शुद्धीवर ये. हा तुला कोण हांका मारीत आहे त्याच्याकडे पहा, ओ म्हण! लाडके! हा तुझा चंद्रराव आला आहे पहा! मी दृष्टीस पडतांच हिला-हा हर्षवायु झाला बरें! मीच चुकलों. स्त्रियांचीं अंतःकरणें ह्मणजे कोमळ असतात. त्यांना दुःखाचा किंवा हर्षाचा कोणताच वेग एकाएकीं सहन होत नाहीं, म्हणून मी या माझ्या लाडकीला एकदम भेटायचें नव्हें. असो. आनंदाच्या झटक्यानें हिचें भान जरी गेलें, तरी माझ्यावर हिची किती निःसीम प्रीति आहे, हें यावरून चांगलें कळून आलें. मनांत प्रीतीचा झरा नसतां नुसतें वरवर गोड बोलतां येतें. पण असा उमाळा फुटायला खरीच प्रीति लागते.

दु०-( बरळत बरळत शुद्धीवर येते. ) कुठें आहे मी ? तुह्मीं त्यांची आणि माझी काय म्हणून ताडातोड केलीत ? मी त्यांचा स्वर ओळखला. माझा प्राण निघून जात होता, तो हा गोड स्वर ऐकून पुनः परत येत आहे. हेच ते, खास हेच. ( नवऱ्यास घट्ट मिठी मारून ) आतां नाहींना कधीं या देहाचा अंतर पडायचा ? जर मेलें माझ्या नशिबांत दुःख भोगायचेंच लिहिलें असेल, तर त्यापेक्षां मला इथें असेंच मरणें पुरवलें.

**चंद्रराव**-आतां दुःखाचें आणि मरणाचें नांवच घेऊं नकोस!

दु०-आपल्याला अवचित पाहून मला जो हर्ष झाला त्यानें मी अगदीं भांबावून गेलें आहें. मी काय बोलतें याची देखील मला शुद्धि नाहीं. म्हणून म्हणतें कीं, एखादा वेडावांकडा शब्द बोललें असेन तर त्याची क्षमा करावी.

**चंद्रराव**-( आनंदाच्या भरानें ) अहाहा ! तुला कुठें सांठवून ठेवूं असें झालें आहे मला !

दु०-बरें मी विचारतें याचें अगोदर उत्तर द्यावें. आपण इथें कसे आलांत ? सांगावें लवकर सगळें. मला तर भ्रम पडल्यासारखें झालें आहे.

**चंद्रराव**-सर्व सांगेन बरें. पण आतां नको.

दु०–आम्हीं इथें समजत होतों कीं, बाळापूरच्या लढाईत–

**चंद्रराव**–समजलों. आणि तें कांहीं सर्वथा खोटें नाहीं. मी त्या लढाईत जखम लागून पडलों होतों. पण आयुष्याची दोरी बळकट होती म्हणून म्हण, तुझ्या सौभाग्याच्या जोरानें म्हण, अथवा परमेश्वराच्या मनांत (तिच्या हनुवटीस हात लावून) हें अनुपम सौख्य मला चिरकाळ द्यावयाचें होतें ह्मणून म्हण, शत्रूच्या शिपायांनीं मला उचलून आपल्या छावणींत नेलें. पुढें सरासरी एक महिन्यानें माझ्या जखमा बऱ्या झाल्या; पण उपयोग काय! मी बरा होतांच शत्रूनीं मला कैदेंत टाकलें. तेव्हां इकडे यायचा बेत माझ्या मनांतच राहिला. तरी तिथून मी बाबांना दोन तीन पत्रें पाठविलीं. परंतु कुणाचेंच उत्तर नाहीं, कीं निरोप नाहीं, कांहीं नाहीं.

दु०–त्यांतलें एक जरी पत्र मला पोचलें असतें, तरी केवढा अनर्थपात टळला असता ह्मणून सांगूं!

**चंद्रराव**–(तिच्या बोलण्याचा खरा अर्थ न समजल्यामुळें) तूं कांहीं जरी केलें असतें तरी माझ्यावरचा अनर्थ टळला नसता बरें? काय केलें असतेंस तूं?

दु०–मी काय केलें असतें तें आतां बोलून काय फळ! मेलें व्हायचें तें होऊन गेलें. पण मीं सगळीं दुःखें सोसलीं असतीं, कुणाची बटीक होऊन राहिलें असतें, निदान हें पोट जाळायला पोटच्या पोराला देखील विकला असता बरें!

**चंद्रराव**–पोटच्या मुलाला?

दु०–हो. आपण खुशाल आहांत हें कळायसाठीं मी आपली मान सुद्धां वाहिली असती. आणखी काय?

**चंद्रराव**–(कुरवाळून) बरें, झालें तें होऊन गेलें. आतां त्याबद्दल दुःख करून काय फळ! सध्यांच्या आनंदांत मात्र व्यत्यय येतो. पुनः आपली गांठ पडली, या सुखापुढें पूर्वीं मीं सोसलेलीं सर्व दुःखें नाहींशीं झालीं. पुरे, उगीच मनाला वाईट वाटूं देऊं नकोस. भोक्तृत्व तेवढें सगळें भोगलेंच पाहिजे.

एवढा परमेश्वराचा अवतार राम ! त्याला देखील भोगानें चवदा वर्षें वनवास भोगायला लावला, मग माझी काय कथा ? चल, आतां तुला अजून पुष्कळ गोष्टी विचारायच्या आहेत.

दु०-( आपल्याशीं ) देवा ! माझे कान बहिरे होतील तर फार चांगलें होईल.

**चंद्रराव**-बरें, माझा बाळ्या कसा काय आहे ? चांगला बोलायला लागला असेल नाहीं ? आमच्या बाबांची प्रकृति कशी आहे ? आणि तुळाजीराव ?

दु०-सगळे खुशाल आहेत. ( डोळ्यांतून पाणी काढून ) मला जरी मामंजींनीं लाथेनें झुगारून लावलें, तरी आपल्यावर ममता करोत एव्हढेंच माझें अंबाबाईजवळ मागणें आहे.

**चंद्रराव**-छे ! हें काय ? आतां कां बरें डोळ्यांतून पाणी ?

दु०-आज सात वर्षें माझ्या डोळ्यांना खळ नाहीं, रात्रंदिवस कपाळीं रडणेंच लागलें आहे मेलें !

**चंद्रराव**-मागचें जाऊं देग. आजपासून तूं सोसलेल्या दुःखांच्या दसपट तुला सुख देईन ह्मणजे झालें कीं नाहीं ? पण बाळ्या कुठें आहे ? त्याला नाहीं का आणीत ?

दु०-खोलींतच निजला आहे. ( त्यास आणायला उठते. )

**चंद्रराव**-नको. निजला असला तर निजूं दे. वाटेच्या श्रमामुळें मलाही आज फार झोंप येते.

दु०-येत असेल खरीच. बरें तर, मी जातें आणि सर्व तयारी करतें. ( जाते. )

**चंद्रराव**-( आपल्याशीं ) खरोखर हें एक रत्न आहे बरें ? मी मोठा भाग्यवान् ह्मणून ईश्वरानें हें माझ्याच हातीं दिलें ? परमेश्वरा, मला पुष्कळ आयुष्य आणखी विपुल संपत्ति दे, ह्मणजे याउपर मी हिला अणुमात्र देखील दुःख होऊं द्यायचा नाहीं. केवढी हिची योग्यता ! हिच्या सद्गुणाला तर मोलच नाहीं. हिच्याकरितां मी जरी हजारों मोहरांच्या ढिगावर लाथ मारली, तरी तें सुद्धां कमी होणार आहे ! त्या माझ्या आंधळ्या, अभागी

आपाला काय ह्मणावें ? प्रत्यक्ष कामधेनू आपण होऊन घरीं आली असून त्याला दिसली नाहीं–बाहेर घालविली ! जाळ ह्मणावें ते सोन्याचे ढीग. या साध्वीच्या पासंगाला सुद्धां पुरायचे नाहींत. माझ्या लाडकीच्या समागमाचें अनुपम सौख्य कुणीकडे—आणखी तुझे ते सोन्यारुप्याचे तुकडे कुणीकडे ? माझ्या पश्चात् हिचे काय काय हाल झाले असतील ! नको पण याविषयीं विचार करून उपयोग नाहीं. कारण, तिच्या विपत्तीला मीच कारण झालों असें मला शेवटीं कबूल करणें भाग पडतें. ( दुर्गा येते. )

दु०–सगळी तयारी करून आलें. जावें आतां निजायला.

**चंद्रराव**–आणि तूं ?

दु०–मी भवानी देवीला नमस्कार करून येतें.

**चंद्रराव**–बरें तर. लवकरच–( असें ह्मणून जातो. )

दु०–( आपल्याशीं ) मी देवीला नमस्कार करून येतें ह्मणून ह्मटलं, पण तिला मी आतां काय ह्मणून नमस्कार करूं ? ती मला काय देणार ? आशा करायसारखें उरलें आहे तरी काय ? कपाळीं होतें तेवढें मी सुख भोगलें. पण आतां माझी ग्रहदशा वाईट आली आहे. यापुढें मरेपर्यंत जिवाला मेल्ले क्लेशच व्हायचे असें दिसतें. (अंमळ विचार करून) तरी क्लेश न सोसायचं माझ्या स्वाधीन आहे. मी देवीला नमस्कार करून येते म्हणून त्यांना सांगितलें नाहीं का ?–पण ते म्हणजे कोण ? ते म्हणजे चंद्रराव–माझे पती अं ! चंद्रराव माझे पती आणि मग आनंदराव हे कोण ? ( डोळे पुशीत ) नशीबा ! कायरे माझ्यावर हा कठिण प्रसंग आणलास ! हेच जर चंद्रराव एकच दिवस अगोदर आले असते तर !–पण आतां अशीच रडत बसलें तर पुढें वाट काय ? कांहीं तरी मेली तोड काढली पाहिजेना ? दोघांशीं लग्न केलें, पण खरी बायको कोणाची नव्हे, काय मेला हा कर्माचा खेळ तरी ! नकोरे देवा ! या विचारांनीं माझें कपाळ भडकून गेलें. खरी साडेसाती ग बाई ! ( किंचित् विचार करून ) बरें, असें केलें तर कसें होईल ?

ल! ह्मणजे लोकांचीं तीं मेलीं घालून पाडून बोलणींही सोसायला नकोत, नी चहूंकडे माझ्या नांवाचा डंकाही व्हायला नको. शिवाय मेल्यें सुख कुणालाच नाहीं. हो, असेंच करावें. एकदां मन घट्ट करून खुपसला कीं सुटलें. (विचार करून) मना, असें मागें घेऊं नकोस बाबा! पण त्यांना एकदां शेवटचें डोळेभर पाहून घेतें, ह्मणजे या जिवाचा अधिक कंटाळा येईल; आणि मग (आकाशाकडे बोट दाखवून अविशानें) यमाच्या घरची वाट–(इतक्यांत चंद्रराव येऊन–)

**चंद्रराव**–" जिवाचा कंटाळा! " आणखी " यमाच्या घरची वाट " काय शब्द हे लाडके! तुझ्या दुःखाचे दिवस गेले, ह्मणून मी सांगितलेंना मघांशीं? पुनः काय बरं हें! लवकर आली नाहींस ह्मणून तुला बोलवायला आलों, तों हे भयंकर शब्द कानीं पडले! दहादां सांगितलें, आणखी एकदां सांगतों कीं, इतःपर तुझ्या स्वप्नांतसुद्धां तुला दुःख होऊं द्यायचा नाहीं.

**दुर्गा**–नाहीं हो! मी संसारांतल्या दुःखांना भीत नाहीं. पण हीं मेलीं असलीं दुःखें सोसवत नाहींत. काय करूं मी? माझी फार दैना दैना झाली बरें! ह्मणून ह्मणतें कीं, यापुढं तरी माझी अशी फटफजीत व्हायला नको.

**चंद्रराव**–मीं कधीं तुला फसविलें नाहीं, व पुढेंही माझ्या हातून तसें व्हायचें नाहीं. लाडके, हें काय बरें? वर पहा. तुझी प्रसन्न मुद्रा पाहूनच मला सुख होणार. नाहीं तर काय?

**दुर्गा**—आपल्याला आनंद होईल, पण माझ्या कपाळीं दुःखाचा डोंगरचना? पुष्कळ पहातें आहे. पण मरणाशिवाय मेली दुसरी तोडच दिसत नाहीं.

**चंद्रराव**–या तुझ्या बोलण्याचा अर्थ काय?

**दुर्गा**–लग्नें सुखाकरतां करायचीं, असें शास्त्रांत सांगितलें आहे. मग मीच का अशी कपाळकरंटी निघालें ह्मणतें!

**चंद्रराव**–माझ्याबरोबर लग्न केलेंस ह्मणून का तुझे हाल झाले?

**दुर्गा**–हाल ह्मणजे किती म्हणून सांगूं! मागें झालें ते झालें-च. आणखी पुढें भोगायचें ते निराळेंच!

**चंद्रराव**–तुझ्या तोंडचे हे शब्द ऐकायलाच का मला परमेश्वरानें जिवंत ठेवलें?

**दु०**–पण मी असें बोलले तरी काय?

**चंद्रराव**–माझ्यामुळें तुला दुःख झालें ह्मणून.

**दुर्गा**–भलतेंच कांहीं तरी! या जगांत माझ्या सौख्याचें भांडार काय तें आपण! आणि आपल्याला मी असें कसें ह्मणेन बरें? तसें जर खरोखरीच मी ह्मटलें असेन तर पदर पसरते आपल्यापुढें.

**चंद्रराव**– आतां असें ह्मणतेस आणि मघाशीं म्हटलेंस कीं, लग्नामुळें क्लेश सोसायाला लागले म्हणून?

**दुर्गा**–शब्द चुकून गेले असतील. पण मनांतून काय ह्मणायचें होतें तें माझ्या ध्यानांत आहे. हं पहा–उपयोग नाहीं हो! तसें झालेंच तें. ( कावरीबावरी होते. )

**चंद्रराव**– तूं खरोखर भ्रमिष्टासारखें कांहीं तरी बडबडतेस. आनंदाच्या भरांत हें प्रथमतः माझ्या लक्ष्यांत आलें नव्हतें. परंतु आतां–

**दु०**–मी आपल्या पायां पडतें! कुणाजवळ बोलूं नका.

**चंद्र०**–तुला आज कांहीं तरी झालें आहे.

**दु०**–होय, मला ठाऊक आहे काय झालें आहे तें; पण मेलें औषध कुठें आहे?

**चंद्र०**–औषध कसलें? थोडी झोंप घेतलीस म्हणजे हुषार होशील. चल, मी तुझ्या मनांतलें दुःख दूर करतों.

**दु०**–अगोदर मूळ नाहींसें केल्याशिवाय दुःख कसें दूर होईल?

**चंद्रराव**–सांग तर दुःखाचें मूळ काय तें. ह्मणजे दूर केलेंच ह्मणून समज.

**दु०**–आपणच माझ्या दुःखाचें मूळ!

**चंद्रराव**–( आश्चर्यानें ) काय मी ! मी तुझ्या दुःखाला कारण झालों ! तो कसा ?

दु०–आपण मला जाणून बुजून दुःख दिलें असें मी ह्मणत नाहीं, पण आपल्यामुळें मला–

**चंद्रराव**–हें असेंच तूं मला सौख्य देणार काय ? केवळ तुझ्या आशेवर इतकीं संकटें भोगलीं, इतके कष्ट सोसले, उपाशी राहून दिवस काढले, फक्त तुझ्यासाठीं तुरुंगाची भिंत उडण्याचें साहस केलें, आणखी त्याची फेड तूं अशी करतेस काय ? इतकी तुझ्यावर जिवापलीकडे प्रीति करीत असून तूं मला आपल्या दुःखाचें मूळ ह्मणतेस तेव्हां आतां काय ह्मणावें !

दु०–उगीच कां मनाला त्रास करून घेतां ? लवकरच होईल याचा उलगडा. ( असें ह्मणून जाऊं लागते, चंद्रराव तिला अडवून ह्मणतो. )

**चंद्रराव**–हें काय ! मला सोडून चाललीस कुठें ?

दु०–जाऊं द्या मला. दोघांचेही हित आहे त्यांत. खरेंच हात जोडते मी. सोडा मला.

**चंद्रराव**– असें भलतें भलतें बोलून गोंधळांत पाडूं नकोस मला. मघांशीं ह्मटलेंस तसें करायचें नाहींना तुझ्या मनांत ? ( आपल्याशीं ) नाहीं पण. हिच्या मनांत आज कांहीं तरी वेड शिरलें आहे खास. त्याशिवाय ही अशी भकायची नाहीं. ( तिला ) लाडके, जरा विचार कर. तो झटका गेला निघून. चल नीज आतां. नाहीं तर जागरणानें पित्त भडकेल. चल–

दु० आतां कुठें चल ! आपली आणि माझी संगत सरली.

**चंद्रराव**–पण तुझी माझी संगत सोडविणार असा कोण ?

दु०–माझें हें फुटकें नशीब ! दुसरें कोण ? आपल्याला ती भयंकर हकीकत कळायची आहे अजून. पण त्या नादीं आपण लागूं नये हें बरें. कारण, ( डोळ्यांस पदर लावून ) आपल्या सुखांत माती पडल्यावर आपण आपल्या भोळसर–प्रेमळ मनाला दोष द्याल, मला अंतःकरणांतून हुसकून लावाल, माझी की

थू कराल! हें मी आतांच सांगतें. कांहीं का असेना! त्याचा मला शेवट हा व्हायचाच. पण मी मेल्यावर माझे अपराध पोटांत सांठवून माझ्यावर दया करा, हें माझें या पायांपाशीं शेवटचें मागणें आहे. ( असें ह्मणून चंद्रराव 'हां हां' ह्मणत असतां ती झटकन त्याला न सांपडतां निघून गेली. )

**चंद्रराव**–(चकित होऊन) याचा अर्थ काय? काय तिनें मनांत आणलें आहे ईश्वराला ठाऊक. माझ्या मनांत तर चमत्कारिकच कल्पना येऊं लागल्या आहेत. छे! मला खास वेड लागणार. यांत कांहीं तरी घोंटाळा आहे, आणि तो लवकरच बाहेर फुटणार! आतां नाहीं माझ्यानें धीर धरवत. मला तें सर्व कळलेंच पाहिजे. पण कळणार कसें? तिच्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं; आणि केव्हां तरी ती गोष्ट जर बाहेर फुटायचीच तर तिनें ती मला सांगितलीच पाहिजे. कारण, माझ्या नशीबाचा हवाला काय तो तिच्यावर. तीच तारो किंवा मारो. ( तिच्या शोधास जातो. )

( अंक चवथा समाप्त. )

---

# अंक ५.

---*---

## प्रवेश पहिला.

### स्थळ–एक खोली.

**पात्रें—चंद्रराव व कोंडाऊ.**

**चंद्रराव**–( इकडून तिकडे फिरत ) बस्स. पाहिजे होतें तेवढें कळलें. 'जगावें कीं मरावें' हें पुष्कळांना एक मोठें गूढ असतें. पण मला तें अगदीं सोपें झालें आहे. हे पहा याचा निकाल कसा लावायचा हें ठरलें. आतां जास्त चवकशी करण्याची जरूरच

उरली नाहीं. जा, मला एक कागद, दऊत आणि लेखणी इतकें आणून दे. कांहीं थोडें ल्याहायचें आहे तेवढें लिहितों, नंतर जाऊन झोंप येते का पहातों. ( कोंडाऊ जाते. ) काळझोंप आली तर सोनेंच झालें. ( दुर्गास उद्देशून ) अरेरे ! लाडके, तुझ्या दुःखाचें कारण आत्तां मला समजलें बरें ! तूं माझ्याशीं भ्रमिष्टा-सारखें बोलत होतीस, तुझें मन थाऱ्यावर नव्हतें, याचें कांहीं मला आतां मोठेंसें आश्चर्य वाटत नाहीं. लाडके, तुझी किती हानि झाली या गोष्टीचा जर मी नुसता विचार करायला लागलों, तर मी देखील वेडा होईन यांत संशय नाहीं. काय बिनतोड प्रसंग हा ! देव कोपला, दैवानें उलट घेतली, ग्रहदशा फिरली. एक-दमच सर्व कसें प्रतिकूल झालें पहा ! हां ! मी भकायला लागलों वाटतें. पुरें आतां. पण मी देवाला आणि दैवाला काय ह्मणून नांवें ठेवतों ? प्रत्यक्ष माझा बाप आणखी माझा भाऊ हेच राहु-केतूसारखे हात धुऊन माझ्या पाठीशीं लागले आहेत. मला खड्यांत घालतील तेव्हांच ते संतुष्ट होतील ! काय चमत्कार आं ! मी जीवंत आहे हें त्याला माहीत होतें; तसेंच आमचें परस्परांवर किती प्रेम आहे हें सुद्धां त्यांना ठाऊक होतें. इतकें असून तिनें आपलें सर्वस्व दुसऱ्याला वाहिलें हें त्यांच्यानें पाहवलें तरी कसें ? किती निर्दय बाप हा ! कोण दुष्ट राक्षसी भाऊ हा ! बरें या अनर्थाबद्दल दोषाचें पाप तुमच्या पदरांत घालीन, आणि मग मी तुमच्या दृष्टिआड व स्मृतिआड जाऊन पडेन, हें खास. ( इत-क्यांत कोंडाऊ कागद, लेखणी वगैरे आणून देते. चंद्रराव एक लहानसें पत्र लिहितो. कोंडाऊ निघून जाते. ) मला गुंगी आ-ल्यासारखें वाटतें हें काय ? माझ्या लाडकीची प्रकृति आज ता-ळ्यावर नाहीं. मला तर झोंपेनें घेरलें. पण ही झोंप कीं काळ झोंप ? काळझोंप आली तर सर्वच काळजी संपली. जाऊं तर खरे. ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

### दुसरी खोली काळ्या व कोंडाऊ.

**कोंडाऊ**–काळ्या, हें काय लचांड झालें पाहिलेंस का ? बाईसाहेबांचे पहिले नवरे चंद्रराव आले.

**काळ्या**–( हंसत ) चंद्रराव आलं ! मंजी समंद होऊनशेनी आलं का काय ?

**कोंडाऊ**–समंद होऊन नाहीं, खरोखरीच आले.

**काळ्या**–अग चल, अशी का ठकबाजी लावलियास माज्या म्होर ? म्येलेलं मानुस परतुन कदीं आलया ? मरून दोन हैन झालं असलं तर एकांद मानुस सप्नांत मानुर कुनाला नरी दिसतं. पन त्येसनी मरून सात वर्स झाली; आन् म्हन चंद्रराव आलं मागारीं ?

**कोंडाऊ**–आतां काय सांगू तुला ? खरेच आले.

**काळ्या**–मग आमचा बा न्हे आला तर? त्यो मरून समदी वर्स चार झाली !

**कोंडाऊ**–अजून तुला खोटें वाटतें ? बाईसाहेबांच्या पायांशपथ चंद्रराव परत आले. झालें ?

**काळ्या**–( गोंधळून ) आं–खर, कवा आलं ?

**कोंडाऊ**–रात्रींच. तूं गोसावडा ह्मणून समजलास तेच चंद्रराव. उगीच त्यांना काईबाई बोललास.

**काळ्या**–मग मानुर त्या भामट्यान तुमासनी खास फशिवलं. तूं झालीस म्हातारी, नवा तुला लागलया येड. अग चायकु मिळावी म्हुनू मीच चंद्रराव अशी त्येन थाप मारली, आनू दुसर काय ? म्या असलं पुष्कळ भोंदू बगिनल्याती. ( रागावून ) इचिभन ! कुट है त्यो ? चल दावतो त्येला काळ्याचा हिसका. चल––

**कोंडाऊ**–मेल्या मोठ्यानें तरी बोलूं नकोस. बाईसाहेबांनी सुद्धां ओळखलें. सगळ्या खुणा पटल्या. आणखी काय म्हणतोस ?

**काळ्या**–बाईसायबानीं वळकूल असल तर मग ह्योर काय लाज ह्मन्न न्हे.

**कोंडाऊ**–तें झालें. पण बाईसाहेब तर पाट लावून चुकल्या, आतां पुढं वाट ?

**काळ्या**–ह्योरली वाट ह्त कुना ल्येकाला दिसतीया ह्मना, पन चंद्रराव किती झाल तरी बी पयल्या लगनाच नवर, तवा जातभाई त्येच्या परमानच सांगनार, बाम्न बी त्येच ह्मन्नार, आन् सरकारा पातोर ग्येल तरी बी तसच व्हनार.

**कोंडाऊ**–हो, मला सुद्धां असेंच वाटतें. पण चंद्रराव आतां पाट लावलेल्या बायकोला नांदायला कसे घेतील ?

**काळ्या**–कां ? त्येला कंचा हरकत हे ? ह्योतुर लागून अजून पुर दोन रोज बी झाल न्हैत. आन् आपली बायकु घरांत घ्येयाला कोन नग ह्मन्नार ?

**कोंडाऊ**–तूं मेल्या अगदीं अडाणी आहेस. गरिबागुरीबांत तसें उष्टंमाष्टं चालतें. पण त्यांना लोक हंसतील कीं तसें केलें तर!

**काळ्या**– हंसत्याल त्यांच दात दिसत्याल. पन बायकु तर गावल कीं न्हे ? आन् इकत बी करायच नसल, तर असना ह्योतुराचा नवरा. त्येच्याकड चार ह्यैन नांदल, ह्येच्याकड चार म्हैन नांदल ! तत काय बिनास्तया ?

**कोंडाऊ**–मेल्या पुरे शहाणपण आतां! तोंडाला जसें कांहीं हाडच नाहीं. मेला म्हणतो ' असेनात दोन नवरे ! ' असें कुठं झालें आहे ?

**काळ्या**–आन् दुरपदिला पाच नवर व्हत म्हुन बाम्न सांगत्यात त्ये ? त्ये खोट असल न्हे ? उगच स्वांग इचिभन !

**कोंडाऊ**–बरें बाबा, तूं ह्मणतोस तें खरें. झालें ? पण अगोदर जिवाजीरावाकडे जा, आणि चंद्रराव आले आहेत असें सांगून त्यांना घेऊन ये, जा.

**काळ्या**–त्या म्हाताऱ्याकडे ! मगग बघा ! तूंच जा म्होव

तर, मी तत ग्येलो तर माज टाळकच सडकिल ल्यो! लंइ कडवा हे बग.

**कोंडाऊ**–तर मग कसें करायचें? मला कांहीं इथून हालतां येत नाहीं. न जाणो, कांहीं बरें वाईट झालें तर दोष आमच्या कपाळीं येणार, ह्मणून ह्मणतें.

**काळ्या**–व्हय, ह्ये मातुर खर. बायलापायीं खून बी पडत्याती. तवा अदुगरच खबरदारी राकावी, यांत शेनपन हे. ह्यो निगालुच बग तडक.

( दोघेहीं जातात. कोंडाऊ बाईसाहेबांकडे जाते. )

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ–निजण्याची खोली.

( चंद्रराव पलंगावर निजला असतां दुर्गा येते. )

दु०–अग बाई! किती लवकर झोंप लागली ही! खरोखरीच किनई, आपण मोठे, मोठे सुखी. कारण, आपल्याला अशी चटकन् झोंप तरी लागते. मी मात्र आतां या झोंपेला अंतरलें. बरें, झोंपेनें जर सुख होतें, तर मग ज्याला पुष्कळ झोंप लागते तो फार सुखी समजायचा. आणखी मरणें ह्मणजे अखंड झोंप घेणें. तेव्हां जो ही अखंड झोंप घेतो त्याच्या सुखाला अंतच नाहीं ह्मणायचा. ( चंद्ररावास उद्देशून ) पण संभाळा बरें! आतां हा वणवा हां हां म्हणतां पसरेल. ह्मणून मी आपल्याला सांगते कीं, आपण पुनः जागेच होऊं नका. जितकी माझ्यावर आपली निर्मळ प्रीति असेल तितकी आपल्याला उद्यां पीडा होणार. ( कांहीं वेळ थांबून ) या मूर्तीकडे पाहूं लागलें कीं प्रत्यक्ष काळाचें देखील कांहीं चालेनासें होतें, आणि पुनः प्रेमाचा उमाळा फुटायला लागतो. पुरे आतां. शेवटचें एकदां डोळे भरून पाहून घेतें ह्मणजे झालें. पण कोण मी मेली निर्दय पहा! ही

अगदीं अखेरची भेट, आणि नुसत्या एकदां पहाण्यानें मनाचें समाधान होईल तरी कसें ? कडकडून मिठीच मारली पाहिजे. (असें ह्मणून चंद्रावाच्या किंचित् जवळ जाते व चपापून म्हणते.) अग बाई! कुणीकडे चाललें मी ? धांवा हो आनंदराव, धांवा लवकर! मी आपली लाज गुंडाळून ठेवून भलतेंच करायला निघालें! असाल तिथून धांवा, आणखी आंवरून धरा मला. (मध्येंच कांहीं ऐकलसें करून) ऐका हं. काय वाजलें तें? दार वाजवीत आहे कुणी. मला वाटतें आनंदराव आले. कुणी का–

**चंद्रराव**–(पलंगावर उठून बसून) लाडके, ये.

दु०–मलाच कुणी लाडके ह्मणून हांक मारीत आहे ?

**चंद्रराव**–किती वेळ अशी दूर दूर रहाणार तूं ?

दु०–(दचकून) अग बाई! हा पुरुषाचा शब्द! माझ्या पलंगावर तो पुरुष कसा आला ? दुसरें कांहीं नाहीं. मेला या जगांत चोहींकडे कसाईपणा माजला आहे. अरे मांगा, 'किती वेळ दूर राहणार का!' ही आलें घे जवळ. (असें ह्मणून खंजीर उपसते, व ह्मणते) नवरे जर स्वर्गांत जातात तर त्यांना स्वर्गांत पाठविणारे कुठें जातात हें मला पहायचें आहे. (हात उचलते. चंद्रराव घाबरून उठतो. त्यास ओळखतांच ती ओरडून ह्मणते) अरे देवा! हे कोण ?

**चंद्रराव**–लाडके, तुझ्या हातांत हा खंजीर! आणि तो मला मारण्याकरितां ?

दु०–(खजील होऊन व हात खालीं करून) होय आपल्यालाच मारण्याकरितां!

**चंद्रराव**–छे! असें कधींच व्हायचें नाहीं.

दु०–वेडाच्या भरांत मी हें नरकाच्या दारांत पाऊल टाकलें होतें, पण आपल्यास पाहून–(असें म्हणून दूर पळूं लागते.)

**चंद्रराव**–(तिला धरण्याकरितां उठून) लाडके! मला पाहून तूं अशी कां बरें दूर दूर पळतेस ?

दु०–माझ्यानें आपल्याकडे पहावत नाहीं हो! देवा! अरे०

मला एकदां अभिष्ट तरी करून टाक पुरी. (असें म्हणून वेगानें पळून जाते.)

**चंद्रराव**–(कोंडाऊ दुरून येत आहे असें पाहून) कोंडाऊ, धांव लवकर! ती पहा तिकडे गेली. धर तिला. (कोंडाऊ जाते.) अरेरे! काय ही बिचारीची दशा झाली! हिच्यापासून मला सुख तर नाहींच, पण उलट यातना मात्र भोगाव्या लागतात. मला आतां पहावें तिकडे भयाण दिसायला लागलें, माझें मन खचलें, चहूंकडून निराशाच बळावत चालली! मी अगदीं मृत्यूच्या तोंडाशीं येऊन पोंचलों. थोडक्याच वेळानें तो मला 'आ' करून गिळून टाकणार, यांत शंका नाहीं। असो. जोंपर्यंत माझीं हीं इंद्रियें माझ्या स्वाधीन आहेत तोंपर्यंत माझ्या लाडकीवर 'दया कर' म्हणून दयाघन परमेश्वराचा धांवा तरी करतों. (असें ह्मणून हात जोडतो, व वर दृष्टि करून ह्मणतो) देवा! तूं सर्वसाक्षी आहेस, तेव्हां तुला निराळें काय सांगायचें! पण माझ्या लाडकीला या हाल्रांतून लवकर मुक्त कर, तसेंच, या तीव्र दुःखाच्या वेगामुळें अंतकाळापूर्वींच जर माझ्या बुद्धीला भ्रम पडून माझ्या हातून कांहीं अपराध घडला तर त्याची क्षमा कर. (हें चाललें आहे, इतक्यांत कोंडाऊ येते.)

**कोंडाऊ**–महाराज बाहेर कोणसा आला आहे. त्याच्या मनांतून आपल्याशीं कांहीं बोलायचें आहे. नांव विचारलें तर कांहीं सांगत नाहीं.

**चंद्रराव**–पण, लाडकी कुठें आहे? तूं तिच्या मागून गेलीसना मघाशीं?

**कोंडाऊ**–होय. त्यांच्या मागून गेलें, पण त्या मला सांपडल्या नाहींत, ह्मणून दोन तीन ठिकाणीं पाहिलें. शेवटीं त्या देवघरांत बसलेल्या मी पाहिल्या. देवापुढें डोकें टेंकून स्वस्थ बसल्या आहेत. दोन चार हांका मारल्या तरी ओ देईनात.

**चंद्र०**–बरें, तूं जा अगोदर तिच्यापाशीं जाऊन बैस. मी

बाहेर कोण आला आहे त्याला भेटून निकडेच येतों. जा. ( जाते. ) हे माझे दोस्त सोमाजीराव आले असतील. या ठिकाणीं काय घोंटाळा उडाला आहे याची त्यांना कल्पनासुद्धां नसेल बरें ! असो, वेळेवरच आले ह्मणायचे. त्यांच्या स्नेहाचा कांहीं तरी उपयोग करून घ्यावा आणि मग--( असें ह्मणून जातो. )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ--रस्ता.

तुळाजीराव पुढें व सटव्या आणि दुसरे तीन मारेकरी मागें.

तुळाजीराव-( मारेकऱ्यांस अंतरावर पण जवळच असे हुषारीनें राहण्यास सांगतो, आणि आपल्याशीं ह्मणतो. )

पुनः मी आपला धाकटा भाऊ तो धाकटा भाऊच ! कधींच याचा निकाल करून टाकायचा. पण मीच चुकलों, असलीं कामें कशीं तडाक्यासरशीं उडवून टाकलीं पाहिजेत. आज करूं, उद्यां करूं, असें ह्मटलें कीं चढलींच उरावर ह्मणून समजावें. खरेंच, धाकटा भाऊ ह्मणजे शुद्ध बेगारी असें समजलें पाहिजे. नांवाचा मात्र भाऊ, बाकी मान काय, मरातब काय, अधिकार काय, सर्व थोरल्या भावाला. धाकट्या भावाच्या वांट्याला काय ? तर याच्यावर देखरेख कर, त्याच्यावर देखरेख कर, अमक्याकडे जा, तमक्याकडे जा, आणि यांनीं खुशाल लोडाला टेंकून रहावें ! आपल्याला नाहीं बा खपत असला दुय्यमपणा. होईल तर एकटा मालक होईन. ही आतां आमच्या दादासाहेबांची स्वारी आली आहे ही स्वस्थ बसेल ह्मणतां ! पुढें पुढें करून--लाल घोंटून त्या थेरड्याची मर्जी पुनः संपा-

-हून करून घेतील. कीं वाजले मग आमचे बारा! शिवाय तो जर जिवंत राहील तर दुसरीच एक भीति आहे. ती ही कीं, आह्मीं केलेल्या सोदेगिऱ्या तो बाहेर पाडणार, आमचें तोंड बंद होणार, आणि सर्वच लाट त्यांच्या हातीं लागणार! छे! तें कांहीं नव्हे. त्याला या जगांतून लंबा केलाच पाहिजे. आणि तो सुद्धां आजच्या आज. कारण, त्या पहिल्या बारावर कांहीं भरंवसा ठेवतां येत नाहीं. तेव्हां ' शुभंच शीघ्रं. ' आपली तयारी कडेकोट आहे. त्याविषयीं कांहीं भीति नको. आला कीं उडवि-लाच. अरे, हा आलाच वाटतें—( आपल्या लोकांस इषारा करतो. इतक्यांत चंद्रराव येतो. व ते चवघे मारेकरी त्याच्या अंगावर धांवतात. चंद्ररावाची व त्यांची झटापट चालते. इत-क्यांत आनंदराव आपल्या भावास घेऊन येऊन पोंचतो. ही मारामारी त्याच्या दृष्टीस पडतांच तो आपले लोक घेऊन धांवतो. मारेकरी पळून जाऊं लागतात, परंतु त्यांपैकीं एक आ-नंदरावाच्या हातीं लागतो. बऱ्याच जखमा लागल्यामुळें ज्याचें सर्वांग रक्तानें भरलें आहे असा चंद्रराव आनंदरावास ओळखून ह्मणतो. )

**चंद्रराव**—जरी माझा जीव मला जड झाला होता तरी आप-ण तो वांचविलात याबद्दल आपला मी ऋणी आहे. परंतु त्यां-च्या हातून मेलों असतों तर फार चांगलें झालें असतें. असो, अजून थोडें भोक्तृत्व आहे ह्मणायचें.

**आनंदराव**—( आपल्या चाकर लोकांस ) हं त्यांना नीट सं-भाळून घेऊन चला. ( सर्व निघून जातात. )

---

## प्रवेश ९ वा.

### स्थळ—देवघर.

दु०—देवा! धडधडीत नवऱ्याचा प्राण घ्यायला धांवलेन कोण तरी मेली राक्षसीण मी! आतां कांहीं ह्मणून प्राण ठेवा-

यची सोय उरली नाहीं. छे ! मनांत सुद्धां नको आणायला. न जाणों, पुनः भ्रमाच्या लहरींत कांहीं तरी भलतेंच करून बसेन. एकदां मन दगडासारखें केलें पाहिजे खरें. मग कां ? ( असें ह्मणून लपविलेला खंजीर हातांत घेऊन त्यास उद्देशून ह्मणते ) बाबा ! माझ्या या शरीरांत पाहिजे तेथें घुसून प्राण घेण्याची शक्ति तुझ्या अंगीं आहे; पण तसें करूं नकोस हो. ही पहा, माझ्या उरांत तुला पाहिजे तितकी जागा आहे. काय पराक्रम दाखवायचा असेल तो येथें दाखीव. ( असें ह्मणून उरांत खंजीर खुपसणार तों आनंदराव येतो, व तिच्या हातांतून खंजीर काढून घेत घेत म्हणतो. )

**आनंदराव**–हां हां हां ! ! काय करतेस हें ? विनाकारण त्या बिचाऱ्या प्राणावर कां उदार झालीस ? असा त्यानें तुझा अपराध तरी काय केला आहे ?

दु०–( आवेशानें ) माझ्या हातून कांहीं अपराध घडला नाहीं अशीं शपथ घ्या, तर तुमचें ह्मणणें मी खरें मानीन. पण माझ्याशीं तुह्मांला काय करायचें आहे ? कृपा करून सोडा मला (.जरा मागें सरून व हा आनंदराव असें ओळखून त्यास ह्मणते ) आपण का हे ! तुमच्याच पायांत इतका अनर्थ बरें ! मी तुमच्याशीं लग्न लावलें हें माझ्या मनांत भरवून द्यायचा आपला बेत होता. पण मी कांहीं अगदीं बोल्यानें नाहीं दूध पीत. समजलांत ?

**आनंद**०–तूं मला आधीं ओळखलेंस का पण ? मी तुझा प्रियकर पती आनंदराव.

दु०–मला आतां पती नाहीं, कोणी नाहीं. माझे पती होते ते बाळापूरच्या लढाईंत पडले. कां ? पडले कीं नाहीं ?

**आनंद**०–हो, पडले खरे.

दु०–पण शपथ घ्या पडले ह्मणून. हं घ्या लवकर, किती उशीर ! ( रक्तानें भरलेला चंद्रराव तलवारीवर भार ठेवून हळूं हळूं येतो. त्याकडे पाहून ) हे रक्तानें माखलेले गृहस्थ माझ्यापुढें

येऊन उभे रहायच्या पूर्वी घ्या शपथ, कीं ते लढाईत पडले म्ह-णून. ( चंद्रावाला ओळखून मूर्छा येऊन पडते. )

**आनंद**०–( तिला सांवरण्याकरितां पुढें सरून ) अहो धांवा लवकर ! पडली–पडली ! ( चंद्रावास ओळखुन ) काय ! चंद्र-राव जिवंत !

**चंद्र**०–मेलोंच होतों. पण प्रारब्ध खोटें म्हणून हे सोहाळे भोगायला जिवंत राहिलों.

**आनंद**०–चंद्रराव किंवा आनंदराव या दोघांपैकीं एक मेला पाहिजे हें ठरलेंच आतां.

**चंद्र**०–( एकीकडे ) तुह्मीं मारेकऱ्यांच्या हातून माझा प्राण वांचविला तो वांचवायचा नव्हता. कारण, मी प्राणाला अगदीं कंटाळून गेलों होतो त्यांतून तुह्मीं वांचविलात हें तर फारच वाईट झालें. लाडके, तुझ्यापुढें माझा अंत व्हावा म्हणून मी इथें आलों. हे तुझे आनंदराव जर माझ्या दृष्टीस पडले नसते, तर मी सुखानें मेलों असतों; पण मरतांनाही मला दुःखच व्हायचें ! असो, नशीब माझें ! बरें शेवटीं तरी एकदां आलिंगन–

**आनंद**०–हां, पुनः ती गोष्ट मात्र नाहीं.

**चंद्र**०–( कपाळावर हात मारून ) नशीब ! ( एकीकडे ) आतां या दुखांत कुचंबत पडण्यापेक्षां दैवालाच सहाय करून एकदां मोकळें व्हावं हें ठीक ! (असें म्हणून हळूच कमरेचा जंबिया काढतो व पोटांत खुपसण्यापूर्वी म्हणतो ) बरें, आनंदराव हें एवढें पत्र कृपा करून आमच्या बाबांच्या हातीं द्या. ( पत्र देतो. ) आणि माझा कांहीं आतां नेम नाहीं. म्हणून मुलाचें आपल्या मुलाप्रमाणें संरक्षण करा. ( जंबिया सरसावीत, सरसावीत ) पर-मेश्वरा, कर आतां मोकळा या दुःखां–( जंबिया उरांत खुपसून घेतो व मरतो. )

**आनंद**०–( घाबऱ्या घाबऱ्या ) अरे अरे ! धांवा कुणी तरी. काय कोणीच येत नाहीं ? हीही बेशुद्धच पडली आहे; अरे कोण आहेरे ? ( असें म्हणून बाहेर जातो. )

दु०-( शुद्धीवर येऊन ) अग बाई ! कुठें पडलें आहें मी ? हं समजलें. मी अगदीं मरणाच्या दारांत येऊन उभी राहिलें आहें. केव्हांच अंत जायची, पण मेला जीव मागें गुंतला म्हणून नाइलाज झाला. ( हुंदका काढून ) जिवंत राहून सोय नाहीं, आणि प्राण तर कांहीं जात नाहीं, असा मेला दोन्हीकडून वणवा पेटल्यावर करावें तरी काय ? ( इतक्यांत चंद्ररावाच्या शवावर दृष्टि जाऊन मोठ्यानें हंबरडा फोडीत ) अरे चांडाळा प्रालब्धा ! घात केलास रे मेल्या ! माझा प्राण काढून नेलास ! माझें सर्वस्व लुटलेंस ! आतां काय करूं ? अहो इथें कुणी आहे का हो ! आतां लवकरच या प्रेताचें, आणि ( आपल्या उरावर हात बडवून ) या प्रेताचें एकदमच दहन करून टाका. उचला हो लवकर कुणी तरी. ( आनंदराव चाकरासह येतो. ) अरे, ही या प्रेतावर अंग टाकून पडली आहे. हिला अगोदर बाजूला काढली पाहिजे. ( तो व चाकर तिला उचलूं लागतात. )

दु०-( संतापानें ) खबरदार मेल्यांनों माझ्या अंगाला हात लावाल तर ! माझा प्राण गेला तरी मी यांना सोडायची नाहीं आतां. ( प्रेतास जोरानें मिठी मारून ) अरे देवा ! हा जंबिया उरांतच आहे अजून ! कोण्या चांडाळाचा हात जळला हा ? (आनंदरावास ) तुम्हींच हो तुह्मींच ही कसायाची करणी केलीत. माझ्या लोभानें तुह्मींच यांचा खून केलात.—

**आनंद०**—न्या तुम्हीं तिला आंत उचलून—हळूंच—

दु०—अरे नका रे मला ओढूं. ( हलकेंच चंद्ररावाच्या उरांतील जंबिया काढून घेऊन लपवून ठेवते. ) नकोरे, तुमच्या पायां पडते. मी तुमची धर्माची मुलगी रे ! ( ते जोरानें ओढतात. ) अरे मेल्यांनो ! माझे हात तरी तोडून टाका, म्हणजे या प्रेताबरोबर जळतील. आतां काय करूं रे देवा ! हे कसाब नाहीं ऐकत माझें ! या प्रेताचे ने आतां हालहाल करतील ग बाई ! अरे मांगानों ! याचा तुह्मांला यमाच्या घरीं झाडा द्यावा लागेल बरें ! ( तिला नेतात. )

**आनंद०**–बरें, आतां पुढें तजवीज ! ( इतक्यांत जिवाजी-राव, तुळाजीराव, सोमाजीराव, काळ्या व आणखी कांहीं चाकर इकडे येतात. )

**जिवाजी०**–(डोळे पुसून) शिव ! शिव ! वृद्धापकाळीं माझ्यावर काय प्रसंग आला हा ! कुठें आहे हो त्याचें प्रेत ? माझ्या दृष्टीस पाडा लवकर !

**तुळाजी०**–हे माझे दादासाहेब इथें पडले आहेत ! (बाप लेक त्या प्रेताजवळ बसतात. )

**आनंद०**–त्यांचें प्राणावसान होऊन बराच वेळ झाला. आज एकादशीचें मरण आलें, तेव्हां खरोखर ते वैकुंठाला गेले ! फारच सज्जन !

**तुळाजी०**–माझ्या दादासाहेबांना वैकुंठ मिळणार यांत शंकाच नाहीं. पण तह्मीं हें जें घोर कर्म केलें त्याबद्दल तुह्मांला मात्र नरकाशिवाय दुसरें ठिकाण नाहीं.

**आनंद०**–( साश्चर्य ) तुह्मीं असें बोलतां याचें मला फारसें आश्चर्य वाटत नाहीं. कारण, प्रत्यक्ष तुमचे वडील बंधूच एकाएकीं वारले, तेव्हां तुह्मांला दुःख होणें हें स्वाभाविकच आहे.

**तुळाजी०**–मग तुमचें ह्मणणें काय ?

**आनंद०**– ह्मणणें एवढेंच कीं, हें कृत्य मी केलें असें मात्र म्हणूं नका.

**तुळाजी०**–कां बरें म्हणूं नका ? तर तुमच्याशिवाय दुसरा कोण करणार ? तुह्मी आतां कबूल करणार नाहीं हें आह्मांला ठाऊक आहे. पण मी पुनः खात्रीनें म्हणतों कीं हें कृत्य तुमच्यावांचून झालेंच नाहीं. तुह्मींच आमच्या दादासाहेबांचा खून केलात. जाऊं द्या, सरकार तरी कांहीं अंधळें नाहीं. या खुनाची नीट चवकशी होऊन अपराध्याला योग्य दंड होईपर्यंत नुसत्या बोलण्यांत काय अर्थ आहे ?

**सोमाजीराव**–( तुळाजीस ) रावसाहेब, मला वाटतें अगोदर हें प्रेत बाजूस उचलून ठेवावें. ( ठेवतात. )

**जिवाजी**०-( आनंदरावास ) तुम्हीं माझ्या मुलाचा खून करण्यासारखा त्यानें तुमचा इतका घोर अपराध तरी कोणता केला होता हो ?

**आनंद**०-मी त्यांचा खून केला नसून तुम्हीं असें विचारतां तिथें इलाज नाहीं. मी तर उलटा त्यांचा प्राण वांचविण्याकरितां धांवून आलों. खोटें असेल तर माझ्या नोकरांना विचारा.

**सोमाजी**०-खरेंच हांक मारा त्यांना. ते काय सांगतात तें तरी ऐकू.

**तुळाजी**०-ते काय सांगणार हो ! सांगून सवरून त्यांचे नोकर ते. शिवाय या कृत्यांत त्यांचेंही अंग असलेंच पाहिजे. आतां तुम्हींच असें पहा कीं ज्यांनीं आपल्या धन्यासाठीं दादासाहेबांचा खून केला, ते खोटें बोलायला मागेंपुढें पहातील का ? छे ! त्यांना विचारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ( आनंदरावास ) तूं यांचा प्राण वांचविण्यासाठीं धांवून आलास काय ? तर मग त्यांचे शत्रू कोण रे ? कुणाचें त्यांनीं नुकसान केलें होतें ? कुणाचें घर बुडविलें होतें ? विनाकारण कोण त्यांच्याशीं दुस्मानपणा करणार ? तुझ्याशिवाय दुसरा कोण त्यांच्या वांकड्यावर असणार रे ? आणखी ह्मणतोस मीं त्यांचा प्राण वांचविला ! अरे चोरा ! मला चांगला संभावित गृहस्थ दिसत होतास कीं ! तें कांहीं नाहीं. दादासाहेबांचें येणें तुझ्या पथ्यावर पडलें नाहीं. तुला वाटलें कीं, आपल्या सुखांत आतां व्यत्यय येणार, ह्मणून तूं आणि त्या अवदसेनें मिळून त्यांना वाटेआड करण्याची ही युक्ति काढलीत. दुसरा कसला संभवच नाहीं.

**सोमाजी**०-असें असेल तर—

**तुळाजी**०-अहो असेल तर कां ? असलेंच पाहिजे.

**जिवाजी**०-तें कांहीं नाहीं. याची नीट चवकशी झाली पाहिजे. चला कुणी तरी जाऊन कोतवालास घेऊन या.

**तुळाजी**०-दुसरा कशाला ? मीच जाऊन घेऊन येतों. ( असें ह्मणून जातो. )

**आनंद०**–हा तुह्मीं माझ्यावर गहजबच उडविलात ह्मणायचा! असो, सत्याचा पक्षपाती परमेश्वर आहे. (आपल्या नोकरांस) अरे, त्या मघांशीं पकडलेल्या इसमाला घेऊन या. (नोकर जाऊन सटव्यास घेऊन येतात.)

**आनंद०**–(त्याच्याकडे बोट दाखवून) चंद्रावाच्या अंगावर तुटून पडलेल्या मारेकऱ्यांपैकीं हा एक आहे. आम्हीं चंद्रावास सोडविलें त्यावेळीं हा आमच्या हातीं लागला. तेव्हांपासून घरांत एकसारखा गोंधळच चालला असल्यामुळें त्याची चौकशी करायला मला झालेंच नाहीं. आतां आपल्या समक्षच त्याला विचारतो ह्मणजे झालें. कायरे, बोल. यासंबंधानें तुला काय माहीत आहे तें सर्व सांग.

**सटव्या**–(घाबरून) सम्द–सम्द सांगतो मायबाप, पन घरीं च्यार पोरसोर हैती त्येंच्याकड बगुनशेनी माझा परान वाचवा.

**आनंद०**–तूं आणि तुझे साथी मिळून चंद्रावाला ठार मारायचा बेत केला होता कीं नाहीं? बोल.

**सटव्या**–व्हय. बवेला व्हता मायबाप.

**जिवाजी०**–(त्याच्या अंगावर धांवून) कांरे! कांरे? त्यानें तुझें काय केलें होतें? बोल.

**सटव्या**–(घाबरून) काय बी न्हवत म्हाराज!

**आनंद०**–(जिवाजीरावास थांबवून) तर मग दुसऱ्याच्या सांगण्यावरून तुह्मीं हें कृत्य करणार होतां कीं काय?

**सटव्या**–व्हय म्हाराज! या पोटापाईं करनार व्हतो.

**आनंद०**–बरें माझ्या संबंधानें तुला काय माहिती आहे

**सटव्या**–काइ न्हे म्हाराज! आमी त्येच्या अंगावर हात टाकला, इतक्या मंदीं आपुन येऊनशेनी त्येचा परान राकला, आन् मला पकडून ठेवला.

**आनंद०**–(सर्वांस) ऐकलेंत? तुह्मीं कांहीं विचारा हवें तर.

**सोमाजी**०-कायरे, हें कृत्य करायला तुम्हांला कोणीं सांगितलें ? ( तो घुटमळतो. )

**जिवाजी**०-बोल कुणी सांगितलें तें, कां उडवूं कोरडे !

**सटव्या**-मला गरिबाला कशाला व्होवती कोरडे ! सम्द सांगतो म्हाराज.

**जिवाजी**०-बोल तर. कुणी सांगितलें ?

**सटव्या**-(भीत भीत ) आपल्याच तुळाजीरावांनीं सांगितलं म्हाराज.

**जिवाजी**०-( सक्रोधाश्चर्ययुक्त ) काय काय ! कुणी सांगितलें ? माझ्या कारट्यानें ! छे ! असें कधीं व्हायचें नाहीं. खोटें बोलतोस तूं.

**सटव्या** – आतां आपल्या म्होर कशापाईं खोट बोलूं ? माजं मनच मला खातया; ह्ये पोट चगा लई वंगाळ है.

**जिवाजी**०-त्यानें काय सांगितलें तुला ?

**सटव्या**-त्ये म्हनूल तुमी चंद्ररावाला ठार करा. मंजी दर असामीला येकेक मुंडास आनू पचीस पचीस रुपई मिळत्याल; आमी सस्कारा मागीतला तवा त्येन ह्ये धा रुपई काडून माज्या हातावर ठ्येवलं. ( असें म्हणून धोतराच्या पदरांत रुपये बांधले होते ते दाखवितो. )

**जिवाजी**०-( संतापानें ) अरे बेरडा ! तुळ्या !

**सोमाजी**०-काय ? त्यांनीं प्रत्यक्ष आपल्या वडील भावाचा खून करायला तुम्हाला सांगितलें.

**सटव्या**-व्हय म्हाराज. आनू आमी त्येच्या अंगावर धाऊन ग्येलो तवा त्ये ततच व्हत.

**जिवाजी**०—हें-हें जर सर्व खरें असेल तर देवा ! मला तूं चांगलें शासन केलेंस. चंद्रावा ! माझ्या पायीं तुझी ही अशी दशा झाली बरें !

**सोमाजी**-बरें, या चोरांचें काय करायचें आतां ?

**जिवाजी०**-चला घेऊन त्याला. त्याला माहीत होतें तितकें त्यानें सांगितलें. ( सदव्याला बाजूस नेतात. )

**आनंद०**-खरेंच, या धांदलींत मी विसरलोंच. जिवाजीराव, चंद्रावांनीं अगदीं अंतकाळीं हें पत्र आपल्याला देण्यासाठीं माझ्यापाशीं दिलें होतें तें घ्या हें. ( पत्र देतो. )

**जिवाजी०**-अहो, तुम्हीं चंद्ररावाचे मित्र, तेव्हां त्याचें अक्षर तुमच्या ओळखींचें असेलच ?

**सोमाजी०**-हो. चांगलें ओळखींचें आहे.

**जिवाजी०**-तर मग वाचा पाहूं. माझे डोळे पाण्यानें भरल्यामुळें मला कांहीं दिसत नाहीं.

**सोमाजी०**-बरें वाचतों. ( पत्र उघडून वाचूं लागतो. ) "चंद्रराव याचा दंडवत साष्टांगनमस्कार. विनंति विशेष. आपल्या दारीं येऊन माझा प्राणांत व्हावा असें झालें. मी लवकरच हें जग सोडून जाणार. परंतु बाळापुराहून मी तुळाजीरावास वरींच पत्रें पाठवून कुशळ कळविलें असतां आपण माझ्या स्त्रीस आनंदरावाशीं लग्न करूं दिलें, हें फार अनुचित केलें. असो. ईश्वर पाहतच आहे."

**आनंदराव**-काय ! ते जीवंत आसल्याबद्दल तुम्हांस ठाऊक होतें ?

**जिवाजी०**-छे हो ! एक अक्षर सुद्धां नाहीं ! ( इतक्यांत कोतवाल व तुळाजीराव शिपायांसह येतात. ) तुळाजीराव, आलास ? हें पत्र पहा. चंद्रराव आपल्या मरणाचें अपेश तुझ्या आणि माझ्या माथ्यावर ठेवतो. तेव्हां तुझें कांहीं त्यांत अंग होतें का ?

**तुळाजी०**-( अत्याश्चर्य दाखवून ) आं ! कुणाचें ? माझें ! माझें अंग ? दादासाहेबांना मारण्यांत ? शिव शिव ! !

**जिवाजी०**—तो त्यांत लिहितो कीं, मीं बाळापुराहून वरींच पत्रें पाठविलीं; आणि मला तर त्यांतलें एक देखील पोंचलें नाहीं. हें कसें ? बरें पण तो जीवंत होता हें तुला ठाऊक होतें काय ?

**तुळाजी**०-दादासाहेब जीवंत! ईश्वराला ठाऊक असेल, मला कांहीं नव्हतें.

**जिवाजी**०-बरें सांग, त्याचें पत्र किंवा निरोप तुला कधीं आला होता का ?

**तुळाजी**०-छे छे छे ! शपथेला सुद्धां नाहीं.

**सोमाजी**०-हें तर मग मोठें आश्चर्य आहे. (जिवाजीरावास) कारण, ते आणि मी बाळापुरांत एकेच ठिकाणीं होतों. तुह्मांला त्यांनीं पुष्कळ वेळ पत्रें लिहिलेलीं मीं पाहिलीं आहेत. त्यांत आपले हाल चालले आहेत अशाविषयीं ते नेहमीं मजकूर लिहित असत. शिवाय त्या पत्रांचीं आलेलीं उत्तरेंही मला दाखवीत असत. आणि तीं तुळाजीरावाकडून आलीं ह्मणून मला सांगत. तुम्हींच त्यांचे बंधू तुळाजीराव ना ?

**तुळाजी**०-मी त्यांचा भाऊ खरा. पण मीं कधीं त्यांना उत्तर धाडलें नाहीं.

**सोमाजी**०-बरें, उत्तरें धाडलीं नाहींत. पण त्यांचीं पत्रें तर येत होतीं ?

**तुळाजी**०-वः ! असें मला शब्दांत पकडतां यावें !

**सोमाजी**०-शब्दांत नाहीं पकडीत बरें ! तीं पत्रें अद्यापि त्यांच्याजवळ सांपडतील-( आठवलेंसें करून खिशांतून पत्रें काढतो. )

**जिवाजी**०-पण त्यांतला साधारण मतलब सांगा पाहूं.

**सोमाजी**०—किरकोळ गोष्टी कांहीं सगळ्या ध्यानांत नाहींत. पण ठोकळ मजकूर ह्मणजे इतकाच कीं, तुमच्या मनांतून त्यांशी मुळींच दाद घ्यायची नव्हती. ते मेले तरी बेहेत्तर !

**जिवाजी**०—अरे अरे ! असें ऐकणें आज माझ्या कपाळीं आलेंना ? अरे नीचा तुळाजी ! तो तुझा सख्खा भाऊ ना रे !

**तुळाजी**—आपल्या पायांशपथ हें माझ्यावर नुसतें कुभांड रचलें आहे. तो कैदेंत होता, कीं त्याचे हाल होत होते, कीं तो

जीवंत होता, यांतलें मला एक अक्षर सुद्धां माहीत नव्हतें. काय तें आतां मीं त्यांचें प्रेत पाहिलें एवढेंच !

**जिवाजी०**—समजलों. अरे, त्या मारेकऱ्याला आणा पुढें. ( लोक सटव्याला पुढें आणतात. )

**तुळाजी०**—( त्याला पाहतांच दचकून मनाशीं ) अरे हा सटव्या ! आतां मात्र सांपडलों खास. बाबासाहेब ! आपणही माझ्या उलट जातां ? हें त्या आनंदरावाचें व या सोमाजीचें--

**कोतवाल**—कां त्याला पहाण्याबरोबर दचकलां ?

**तुळाजी०**–दचकतो कां ? कायरे सटव्या–

**सोमाजी०**—रावसाहेब; याचें नांव आपल्याला कसें कळलें ! त्याला कशाला विचारतां ? त्यानें सर्व आधींच कबूल केलें आहे. ( इतक्यांत पाहिजे होतें तें पत्र सांपडतें. ) हें पहा. हें पहा तुमचें पत्र ! नाहीं म्हणत होतों पण सांपडलें. माझ्याच खिशांत होतें.

**जिवाजी०**–आणि हें यानेंच पाठविलेंना ? काय काय आहे त्यांत ? वाचा पाहूं.

**सोमाजी०**--मीं आतां सांगितला तोच मजकूर. यांच्या हातचें पत्र सांपडलें, आतां हरकत नाहीं बोलायला. कां तुळाजीराव, तुम्हींच लिहिलेंत का हें पत्र ?

**तुळाजी०**—( कावऱ्याबावऱ्या मुद्रेनें इकडे तिकडे पहात मान हालवितो. )

**जिवाजी०**—तुळ्या ! अरे हें मांगाचें कसब कुठें शिकलास ? यापेक्षां माझाच कां नाहीं गळा कापलास आधीं, म्हणजे हा प्रसंग पहायला तरी वांचलों नसतों. असा कां भामट्यासारखा पहातोस ? लहानपणींच तुझीं चिन्हें दिसत होतीं. पण सापाच्या पोराला वाढविल्यासारखा तुला वाढवून हा अनर्थ माझ्या मूर्खपणानें मीच घडवून आणला.

**तुळाजी०**–बोला, काय पाहिजे तें बोला. सांपडलों खरा तुमच्या तावडींत. खोटीं पत्रें आणा, लटकाच साक्षीदार पुढें करा, त्याच्याकडून तुह्मांला हवें तें बोलवा—

**जिवाजी**०–अरे मांगा! तुझ्या बापाला हे शब्द! हा तुझा काका–सटव्या तुझ्यापुढें उभा आहे पहा! ज्याला तूं इसारा ह्मणून दहा रुपये दिलेस तोच हा. ( कोतवाल आपल्या शिपायांस हुषार रहाण्याविषयीं इषारत करतो. )

**तुळाजी**०–( मनाशीं ) कबूल झालों तरी प्राण वांचत नाहीं आतां, आणि नाकबूल झालों तरी वांचत नाहीं. मग डर तरी कशाला! केलें तें बेधडक सांगून टाकावें. सध्यां मला इतकेंच वाईट वाटतें कीं, मारेकरी घालण्याच्या कामांत किंचित् अविचार झाला त्यानें मीही ठार झालों, आणि माझे सर्व बेतही फसले.

**जिवाजी**०–( रागानें ) कांरे बेरडा! तोंड कां बंद झालें? तूं आपल्या सख्ख्या भावावर मारेकरी घातलेस कीं नाहीं बोल.

**तुळाजी**०–हो घातले. हा सटव्या त्यांपैकींच एक आहे.

**कोतवाल**–( शिपायांस ) पकडारे तर याला. आतां याला शिक्षा ह्मणजे हत्तीच्या पायांशीं बांधायचें, किंवा तोफेच्या तोंडीं द्यायचें.

**जिवाजी**०–( संतापानें ) आणि कडकडीत तेलांत तळून कां काढाना या मांगाला! पण चांडाळा, हें घोर कृत्य तूं कोणत्या उद्देशानें केलेंस?

**तुळाजी**०–दुसरा कोणता? जगांतल्या पुष्कळ लोकांचा असतो तोच माझा. ह्मणजे द्रव्य; आणि तेंच माझ्या नाशाला कारण झालें. तुह्मी त्याच्यावरच पूर्वी फार लोभ करीत होतां, ह्मणून मला वाटलं कीं तो जर जीवंत राहील तर पुनः तुमची माझ्यावरची मर्जी उडेल, आणि मरेपर्यंत मला तुमच्यापासून एक फुटकी कवडीसुद्धां मिळायची नाहीं. उलट याल तें अन्नवस्त्र घेऊन आणि सांगाल तें काम करून रहावें लागेल. तें मला प्रशस्त वाटेना ह्मणून मी अशी तोड काढली. तुह्मींच जर आम्हां दोघांना पहिल्यापासून सारख्या ममतेनें वागावलें असतें तर हा आजचा प्रसंग आला नसता. माझें कांहीं जरी झालें तरी या अनर्थाचें खरें मूळ आपण.

**जिवाजी०**—( डोळे पुशीत ) खरें बाबा! ह्यातारपणीं माझ्या नशिचीं पुत्रशोक लिहिला होता ह्मणून मला तशी बुद्धि झाली. कुटुंबांतल्या माणसांत किंवा पोटच्या पुत्रांत आवडनावड केली ह्मणजे असा कांहीं तरी भयंकर परिणाम होतो. देवा! मला वेळींच कां यें नाहीं शिकविलेंस? असो. तुझी इच्छा!

**आनंद०**—बरें तुळाजीराव, चंद्रराव जिवंत आहेत असें तुह्मांला माहित असून त्यांच्या स्त्रीबरोबर लग्न करण्याची मला कां बरें भर घातलीत?

**तुळाजी०**—बस्स, तशींच कांहीं कारणें होतीं म्हणून.

**आनंद०**—ह्मणजे मला सांगत होतां तींच ना कारणें?

**तुळाजी०**—तीं नव्हेत. तीं फक्त तुह्मांला सांगण्यापुरतींच! खरें कारण ह्मणजे असें कीं, चंद्ररावाची आपल्या बायकोवर अतोनात प्रीति होती हें मला ठाऊक होतें. तेव्हां कदाचित् तो जरी कैदेंतून सुटून घरीं परत आला तरी बायकोची अशी व्यवस्था झालेली पाहून तो फार दिवस जगायचा नाहीं असा माझा तर्क होता.

**कोतवाल**—असा जर तुझा तर्क होता तर मग तूं त्याला ठार कां मारविलेंस?

**तुळाजी०**—नुसत्या तर्कावर भरंवसा ठेवणें बरें वाटलें नाहिं म्हणून.

**जिवाजी०**—बरें, माझ्या नातवाबद्दल लोकांत कुजबुज आहे म्हणून सांगत होतास तें कशासाठीं?

**तुळाजी०**—तुम्हीं त्याला संपत्तीचा चवथा हिस्सा देणार होतां म्हणून बरें. आतां झाले तुमचे प्रश्न? मला उत्तरें द्यायचा कंटाळा आला. तेव्हां मला आतां कुठें घेऊन जाणार तिकडे घेऊन चला ह्मणजे झालें.

**जिवाजी०**—भोग चांडाळा तुझ्या कर्माचीं फळें! हे कोतवाल

आहेत आणि तूं आहेस. हिरा गेला. आतां खापरी कशाला पाहिजे ! ( हें ऐकतांच कोतवाल त्यास घेऊन जातो. )

**जिवाजी०**–देवा ! आतां हा पुत्रशोक मला कसा सहन होईल ! यापूर्वींच माझें डोळे मिटले असते तर चांगलें झालें असतें. ( कोणी येत आहेसें पाहून ) अरे रे रे ! ही माझी सून येत आहे वाटतें ! देवा ! काय ही हिची दशा केलीस ? ही तर अगदींच भ्रमिष्ट झालेशी दिसते. झालें. खचली माझी कंबर. ( इतक्यांत भ्रमिष्ट झालेली दुर्गा येते. मागून मुलगा रडत रडत येतो. )

**आनंद०**—( तिला पाहून ) अरे ही कशी आली इथें ?

**दुर्गा**—( भ्रमांत ) कांहीं नको बरें ! हा मेला सगळा कसायांचा बाजार आहे. मी कुणाचेंच कांहीं ऐकत नाहीं. अहो ! पण कोतवालकचेरी कुणीकडे आहे ? मला एक फिर्याद करायची आहे. तुमच्याकडे करूं का ? हालवा माना ! नको तर राहिलें. तुह्मीं कसे हे माझे हाल मांडले आहेत याबद्दल मी देवाजवळच फिर्याद करते. देवा ! बघरे हे मला कसे छळतात ते. ( असें ह्मणून पुढें येऊं लागते. )

**जिवाजी०**— ( रडत ) हिच्या तोंडाकडे सुद्धां मला पहावत नाहीं ! देवा ! आतां माझे हे डोळे मिटीव.

**दु०**—( चंद्ररावाचें प्रेत नाहींसें पाहून ) अरे प्रालब्धा ! तुह्मीं कुठें नेलेंत त्यांना ? आत्तां इतक्यांत इथें होते, मी प्रत्यक्ष पाहिले होते. ( रडूं लागते. ) कुठें हो तुह्मांला नेऊन माझ्या दृष्टिआड दडवून ठेवलें ! ( लोकांस ) दाखवा हो. मला त्यांना कांहीं विचारायचें आहे. एकदां तरी डोळे भरून पहातें हो ! नाहींना भेटवीत ? बरें तर. ( मुलाला उचलून घेऊन ) हा माझा लाल ग बाई ! आतां कसें होणार ? ( चुंबन घेऊन ) या माझ्या सोन्यावर दयेचें पांघरूण कोण घालणार आतां ? जगांतला तर न्याय मेला बुडालाच सगळा. पण देवा तुझ्या घरींसुद्धां कसा नाहींसा झाला रे ? ( चंद्ररावास उद्देशून ) त्यांनीं कशी खाशी

वेळ साधली ! जातों म्हणून मला नुसतें कळविलें देखील नाहीं. पण त्यांचा माझ्यावर खरा जीव बरें ! कुणाला न कळत लौकर ये म्हणून मला मूळ धाडलें. बाळ्या, तुझें नशीब तुझ्याबरोबर. (मुलाचें चुंबन घेऊन) मी आतां येतें हं ! ( असें म्हणून लपवून आणलेला खंजीर चट्कन् उरांत भोसकते व पडते. मंडळी धांवतात; पण व्यर्थ. ) आतां मी तुमच्या देवाला सुद्धां भीत नाहीं बरें ! मांगानों ! कसायानों ! रडा आतां मागें आमच्या नांवानें. अंबाबाई, मला लवकर—( मरते. )

**जिवाजी०**—( गोंधळून ) तोच खंजीर खुपसारे या माझ्या उरांत. नाहींतर मला जिवंत तरी जाळून टाका !

( मूर्छा येऊन पडतो; त्याच वेळेस पडदाही पडतो. )

समाप्त.

# विक्रीस तयार.

खाली लिहिलेली पुस्तकें आर्यभूषण छापखान्यांत मिळतील.

**रा. रा. शंकर मोरो रानडे बी. ए. कृत:—** किंमत. रु० आ०

| | | |
|---|---|---|
| दौलतराव नाटक. ... ... ... ... | ०१० | ०१ |
| प्रेमगुंफित. ... ... .. ... ... | ०५ | ०१ |
| ..केरद्दान विवेचना नाटक ... ... | ०५ | ०॥ |
| डाक्टर व वैद्य प्रहसन... ... ... ... | ०२॥ | ०॥ |
| चंडकौशिक. ... ... ... ... ... | ०६ | ०१ |
| अनिपीडचरित नाटक... ... ... ... | १०४ | ०२ |
| वारिस्तंस नाटक. .. ... ... ... | ०८२ | |
| अनुलापशमन नाटक... ... ... ... | ०१२ | ०१ |
| पतिशिक्षाप्रहसन. ... .. ... ... | ०४ | ०॥ |
| लटपटाध्याय प्रहसन... ... ... ... | ०२ | ०॥ |

**रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. कृत:—**

मोहविलसित नाटक (Shakspears Winters tale). ०८ ०१

..लभानुनय (All's well that end's well)... ०१

**रा. रा. गोविंद बल्लाळ देवलकृत:—**

दुर्गा नाटक. ... ... ... ... ... ... ०५ ०॥

**रा. रा. गणेश बळवंत जोशी बी. ए. कृत:—**

रानसुंदरी. ... ... ... ... ... ... ०८ ०१

---

| | | |
|---|---|---|
| केसरीतील निवडक निबंध (भाग १) ... ... | १ | ०३ |
| केसरीतील निवडक निबंध ([illegible]) ... ... | १ | ०३ |
| निबंधमाला. ... ... ... ... ... ... | ३ | ०३ |
| संगीत शाकुंतल. ... ... ... ... ... | ०१२ | ०१ |
| संगीत सौभद्र. ... ... ... ... ... | ०१२ | ०१ |